# “सहसंवेदना सर्वेक्षण”

## माहिती संकलन

## व

## निष्कर्ष

***(Survey On Gender Equality, Women Safety***

***And Legal Awareness)***

**© प्रा.डॉ.रश्मी पारसकर-सोवनी**

**(सदर सर्वेक्षण/ अभ्यास We 4 Change च्या संस्थापक डॉ. रश्मी पारसकर-सोवनी यांनी केला असून यातून आलेली तथ्ये-निष्कर्ष व अभ्यास याचा वापर त्यांच्या नावासह त्यांच्या सहमतीने करणे अपेक्षित, आवश्यक व बंधनकारक आहे.)**

# अभ्यासकर्तीचा परिचय



**प्रा.डॉ.रश्मी पारसकर-सोवनी.**

**संस्थापक , We 4 Change**

- नक्षलग्रस्त भागातील आदिवासींसाठी कार्य. महिलांवरील हिंसाचार, महिलांसंदर्भात सायबर गुन्हे, बलात्कारीतेस मदत, कामाच्या ठिकाणी होणारा लैगिक छळ यासारख्या महिलांच्या समस्यांवर काम केले.
- शिक्षण- M.A. (इंग्रजी व वुमन्स स्टडीज ), SET, Ph. D., FCC फ्रेंच. पीएच.डी. विषय - 'Partition Novels: An Imaginative Rendering'.
- लेखिका, हरहुन्नरी प्रवासी, कथ्थक नृत्यांगना आणि कलेची जाणकार.

**प्रा.डॉ. रश्मी पारसकर-सोवनी.**

संस्थापक, We 4 Change

संपर्क - 9552229292

ईमेल rushsovani89@gmail.com

**WE 4 CHANGE**

इमेल - we4change20@gmail.com

वेबसाईट- - https://www.we4change.in/

संपर्क - 9518713660

पत्ता - 67, जास्वंद, कलोडे कॉलेजसमोर, ओंकार नगर, नागपूर 440027

## प्रवास आजवरचा..!

प्रत्येक स्त्रीचा आपापला असा एक संघर्ष असतो. हा संघर्ष विविध पातळीवर विविधांगी कारणासाठी असतो. स्वतःच्या वकुबानुसार, परिस्थितीनुसार तसेच अंर्तगत जाणीवाच्या संवेदनशीलतेनुसार ती व्यक्त होत असते. संघर्ष करीत असते.

दंडकारण्यातून फिरताना अनेक आदिवासी महिला भेटल्या ज्या माझ्यापेक्षा अनेक बाबतीत सक्षम होत्या, स्वतंत्र होत्या; तर अनेक बाबतीत माझ्यापेक्षा वंचित (अंडर प्रिव्हिलेज) होत्या. एक माणूस म्हणून आपली किंमत व्हावी, यासाठी त्यांची केविलवाणी धडपड सुरू होती, जशी माझी केविलवाणी धडपड होती एक स्त्री म्हणून आपली किंमत व्हावी यासाठी. त्यांचा लढा मोठा की माझा संघर्ष हे मी सांगू शकत नाही कारण स्पर्धाच असेल, तुलनाच असेल तर कोण किती केविलवाणी याची!

त्यासोबतच माझ्या विद्यार्थिनींचाही संघर्ष मी बघत होते - जीन्स घालणे, लिपस्टिक लावणे, ग्रॅज्युएशन होईपर्यंत लग्न लांबणीवर टाकणे, बॉयफ्रेंडने ब्लॅकमेल केले तर त्यामधून मार्ग काढणे, बसमध्ये नकोसा स्पर्श झाला तर दुर्लक्ष करणे, रोड रोमिओ मागे लागला तर कॉलेज बंद करतील म्हणून घरी न सांगणे यासाठी त्या आपली बरीच ऊर्जा आणि कौशल्य खर्च करतात हे मला जाणवले.आम्ही सगळेच लढत होतो.

या सगळ्या स्त्रियांमध्ये मला एक समानतेचा धागा सापडला. आदिवासी महिलांच्या आरोग्याच्या समस्या आणि माझ्या कॉलेजमध्ये शिकणाऱ्या शहरी मुलींच्या आरोग्याच्या समस्या एकच होत्या. या तथ्याने मला आश्चर्याचा धक्का बसला आणि मी मुलींशी बोलायला सुरुवात केली. इथूनच महिलांचा प्रश्न ऐरणीवर यायला हवा, महिलांच्या प्रश्नावर काम करणारी एक फळी तयार व्हायला हवी, एकमेकांना साथ देत, बळ देत पुढे जायला हवे आणि त्यासाठी एक संघटना हवी ही संकल्पना आकारली आणि We 4 Change संघटना सुरू केली.

महाविद्यालयीन मुलींचे प्रश्न उमजू लागले आणि त्यातूनच #देसीमीटू कार्यक्रमाची संकल्पना जन्मास आली.  भारतात महिलांना विविध प्रकारच्या अत्याचारांना सामोरे जावे लागते. यात बलात्कार, मारपीट, हुंडाबळी, सासरच्यांकडून छळ असे हिंसक अत्याचार तर असतातच पण त्यासोबतच रस्त्यावरून जाताना मुलींना अश्लील कमेंट पास करणे, शिटी मारणे,

प्रवासादरम्यान तसेच शाळा कॉलेजमध्ये पुरुषांचे नकोसे स्पर्श सहन करणे, बॉडी शेमिंग, अश्लील मेसेजेस इत्यादीचा समावेश होतो.

भारतात आपण बलात्कार, हुंडाबळीबद्दल बोलतो पण मुलींना रोज विविध प्रकारच्या विनयभंगाचा सामना करावा लागतो त्याबद्दल आपण तितकेसे गंभीर नसतो. हे अत्याचार आपल्या खिजगणतीतही नसतात. महाविद्यालयीन तरुणींशी संवाद साधला असता मुलींना बस, ऑटो, ट्रकवाले, हॉटेलातील वेटर, कॉलेजमधील मित्रांपासून ते परिचित-नातेवाईकांपर्यंत कोणीही कसेही वागवतं असे त्यांनी सांगितले. समाजात मिळणाऱ्या दुय्यम वागणूक व अश्लील तिचा सामना मुली कसा करतात हा संशोधनाचा विषय आहे हे जाणवले. तसेच हे सगळं बोलून मोकळे व्हावे असे महाविद्यालयीन तरुणींनाही वाटले. हे भीषण वास्तव समाजासमोर मांडावे या हेतूने #देसी मी टू कार्यक्रम घेण्यात आला. यात शालेय व महाविद्यालयीन मुलींपासून 45 वर्षाच्या महिलेपर्यंत सर्व सामाजिक व आर्थिक स्तरातील महिलांचा समावेश होता.

या कार्यक्रमात मुलींनी ज्या दिवशी विनयभंगाच्या विविध प्रकारच्या प्रसंगांचा त्यांना सामना करावा लागल्या त्या दिवशी त्यांनी घातलेले कपडे, प्रसंगाचे वर्णन व त्या मुलींचा नावासकट फोटो याचे प्रदर्शन भरवण्यात आले.

यात शाळेच्या युनिफॉर्म पासून WCLच्या खाणीत वजन काट्यावर काम करणाऱ्या मुलीच्या लेगिंग कुर्त्यापर्यंत, तर पाच वर्षाच्या बालिकेचा बलात्कार झाला त्या बालिकेचे कपडे, तर 45 वर्षाच्या महिलेच्या साडीचा समावेश होता. पाच वर्षांची बालिका सोडली तर इतर सर्व मुली व महिलांनी आपले नाव जाहीर केले. एवढेच नव्हे तर मुलींनी व्यासपीठावर येऊन अनुभव कथन केले. महाविद्यालयीन विद्यार्थी, काही मुलींचे नातेवाईक बोलले. या अनुभव कथनानंतर मुलींना खूप मोकळे, हायसे वाटले असा फीडबॅक त्यांनी दिला. तसेच अशा प्रसंगांना सामोरे कसे जायचे याची समज कायद्याबद्दलचे ज्ञान मुलींमध्ये नसल्याचे जाणवले व यातूनच पुढील कामाची दिशा ठरली.

तरुणाईमध्ये जाणीव-जागृतीचे काम आवश्यक असल्याचे प्रकर्षाने जाणवले. त्यासाठी अवेअरनेस प्रोग्राम वर्कशॉपचे आयोजन करावे असे ठरले. #देसी मी टू हा एक प्रयोग होता. भारतातील सेलिब्रिटी जसा लैंगिक अत्याचाराचा सामना करतात तसेच सामान्य मुली पण करतात हे वास्तव अधोरेखित करण्याचा तो प्रयत्न होता.

https://www.we4change.in/case-study/2022/02/21/desimetoo/

#देसी मी टू हा एक गुणात्मक संशोधन (क्वालीटेटीव्ह रिसर्च) होते असे म्हणता येईल. अवेअरनेस प्रोग्राम घेण्याआधी #देसी मी टू मधून जे निष्कर्ष निघालेत ते सार्वत्रिक आहेत का हे तपासून पाहणे आवश्यक वाटले. म्हणून सहवेदना सर्वेक्षण हा सर्वे करण्याचे ठरवले.
https://www.we4change.in/case-study/2023/02/21/sahsanvedana-survey/

माडिया गोंड या आदिम आदिवासी गट (पीव्हीटीजी ट्राईब) मध्ये जन्माला आलेल्या नऊ वर्षाच्या मुलीवर चाळीस वर्षाच्या अनिल मडावी या तिच्या शेजाऱ्याने बलात्कार केला आणि जातपंचायतने त्याला जातीत मटणाच्या जेवण देण्याची शिक्षा ठेवली. गावजेवण सुरू असताना ती बालिका आपल्या झोपडीत उपचाराकरिता विव्हळत पडली होती. आम्ही कार्यकर्ते गावात भेट द्यायला गेलो तेव्हा हा प्रकार उघडकीस आला.
https://www.we4change.in/case-study/2018/02/20/when-rape-of-a-child-is-celebrated-by-jat-panchayat-mohali-jat-panchayat-case/

गडचिरोलीतील नक्षलविरोधी C60 या स्पेशल पोलीस दलातील पोलीस मिथुन रासेकर याने हँडपंपवर पाणी भरणाऱ्या महिलेचा हात धरला व अश्लील वर्तन केले. त्यावेळी पीडितेच्या बाजूला उभे राहून मिथुन रासेकरवर कारवाई करण्यास We 4 Change संघटनेने पोलिसांना भाग पाडले.
https://www.we4change.in/case-study/2023/02/21/police-mithun-rasekar-molestation-case/

उमरेड येथील WCLच्या खाणीत वजन काट्यावर काम करणाऱ्या सुशिक्षित तरुणीवर ट्रक क्लीनरचे काम करणाऱ्या नराधमाने बलात्कार केला तेव्हा तिच्या आईने कॅमेरासमोर येऊन मुलीसाठी न्यायाची मागणी केली. तेव्हा We 4 Change तिच्यासोबत उभी होती.
https://www.we4change.in/case-study/2023/02/21/toilet-ek-bhaykatha/

फ्रेंड्स गारमेंट्स या प्रसिद्ध दुकानात नागपूरमधील आघाडीच्या शाळा-कॉलेजचे उच्चभ्रू विद्यार्थी युनिफॉर्म विकत घेतात. तिथल्या चेंजिंग रूममध्ये मोबाईल कॅमेरा ठेवून अल्पवयीन

मुलींचे शूटिंग केले जात होते. या प्रकरणात कोणी हात घालायला तयार नसताना We 4 Change संघटना पुढे आली.

https://www.we4change.in/case-study/2019/08/29/the-dark-trend-of-hidden-spy-cameras-friends-garments-changing-room-case/

या सर्व प्रवासात एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे संघर्षाचे स्वरूप कसेही असो त्याची व्याप्ती आणि गांभीर्य हे सारखेच होते. नक्षलग्रस्त भागात लोकसहभागातून पूल बांधत असताना रमेश भाऊ हा कार्यकर्ता पुढे आला, विकासाची भाषा बोलतो म्हणून माओवाद्यांनी त्याची हत्या केली. नवऱ्याचे अधुरे काम पूर्ण करण्याच्या प्रबळ इच्छेने दिवंगत रमेशभाऊंची पत्नी सुनीता हिमतीने पुढे आली आणि नक्षलग्रस्त भागात पूल बांधण्याचे काम पुन्हा सुरू केले. तिची हिम्मत बघून गावकरी पण पुढे आले आणि लोकसहभागाने पूल पूर्ण झाला.

यादृष्टीने सुनीता हिंमतीची बाई आहे, हे सिद्ध झाले तसेच नागपूरच्या एका विद्यार्थिनीला रुचिताला, लग्नाच्या दबावामुळे बंद होणारे शिक्षण केवळ तिच्या आजीच्या समर्थ साथीने पुढे नेता आले. या अर्थाने रुचिताची आजी हीसुद्धा संघर्ष करणारी हिमतीची बाई आहे जिने घरच्यांचा विरोध पत्करून आपल्या नातीला शिक्षण पूर्ण करायला साथ दिली. आजवर ज्या बलात्कार पीडित महिलांनी लढा दिला त्यांचेही खरे तर कौतुक करायला हवे. पण त्यांचे कौतुक, जाहीर सत्कार करता येत नाही कारण आपल्या समाजात ती लढवय्या असूनही तोंड दाखवू शकत नाही, या गोष्टीची खंत वाटते. आपल्या समाजात स्त्री हे अशा प्रकारे कायम प्रताडीत होत राहिली आहे. त्याला अनेक कंगोरे आहेत. ज्यात बलात्कार होणे, माओवाद्यांनी डोळ्यादेखत पतीची हत्या करणे, लठ्ठ मुलीला दाबून 'तू लोड-गादी आहेस' असं म्हणणे, आणि तिने आवाज उठवला तर तुझ्यासारख्या जाडीकडे कोण पाहिलं असा चारचौघात अपमान करणे, नातेवाईकांनी, परिचित, अनोळखी, सहप्रवासी यांनी केलेला विनयभंग, यापैकी कोणते दुःख मोठं, कोणाचा संघर्ष मोठा हे आपण कोणत्या निकषांवर ठरवणार? यातूनच #देसी मी टू - हा अभिनव कृतीशील उपक्रम सुचला. यातून अशा प्रसंगांना सामोरे कसे जायचे याची समज कायद्याबद्दलचे ज्ञान मुलींमध्ये नसल्याचे जाणवले. आणि पुढील कामाची दिशा ठरली. तरुणाईमध्ये जाणीव-जागृतीचे काम आवश्यक असल्याचे प्रकर्षाने जाणवले. त्यासाठी अवेअरनेस प्रोग्राम वर्कशॉपचे आयोजन करावे असे ठरले. त्याआधी #देसी मी टू मधून जे निष्कर्ष निघालेत ते सार्वत्रिक आहेत का हे तपासून

पाहणे आवश्यक वाटले. म्हणून सहवेदना सर्वेक्षण हा सर्व्हे  करण्याचे ठरवले तो आपल्या पुढे मांडीत आहे. आपण सारे तो समजून घ्याल व स्त्री अत्याचार विरोधात मजबूतपणे उभे राहाल, असे वाटते.

आपणास अधिक माहिती हवी असल्यास आपण संपर्क साधू शकता.


**प्रा.डॉ. रश्मी पारसकर-सोवनी.**

संस्थापक, We 4 Change

संपर्क - 9552229292

ईमेल rushsovani89@gmail.com

**WE 4 CHANGE**

इमेल - we4change20@gmail.com

वेबसाईट- - https://www.we4change.in/

संपर्क -  9518713660

पत्ता - 67, जास्वंद, कलोडे कॉलेजसमोर, ओंकार नगर, नागपूर 440027

# सहसंवेदना सर्वेक्षण : माहिती संकलन व निष्कर्ष

## प्रस्तावना -

आपण सारेच एकविसाव्या शतकात आहोत. या काळात महिला आणि त्यांचे प्रश्न हे पूर्वीच्या तुलनेत कमी झाले आहेत, महिला सबल झाल्या आहेत असे वारंवार सांगण्यात येते. परंतु महिला आजही पूर्वी इतक्याच सुरक्षित अथवा असुरक्षित आहेत का याचा विचार करता We 4 Change ने एक सर्वेक्षण करायचे ठरवले. दोन गटात सर्वेक्षण करताना वय वर्ष 18 ते 25 आणि वय वर्ष 25 ते वरच्या वयातील महिलांचा अभ्यास करण्याचा निर्धार केला. हा निर्धार प्रामाणिकपणे महिलांचे प्रश्न समजून घेण्यासाठी आणि त्यांची सद्यस्थितीच नव्हे तर मनःस्थिती समजून घेण्यासाठी होता.

वय वर्ष 18 वर्षापासून 60 वर्षाच्या वयोगटातील 609 महिलांनी फॉर्म भरले याचाच अर्थ 1960 च्या दशकाच्या आसपास जन्मलेल्या महिलेपासून ऐन तारुण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या म्हणजे साधारण 2005 पर्यंत जन्मलेल्या पिढीने पण स्त्री म्हणून आपले अनुभव नोंदवले आहे. म्हणजे या अभ्यासात नवयुवती, तरुणी, मध्यमवयीन महिला ते आता वृद्ध महिला (सिनियर सिटीझन) या कक्षेत मोडणाऱ्या स्त्री वर्गाने सहभाग नोंदविला आहे

या सर्वेक्षणाबद्दल जेव्हा जेव्हा सहभागींच्या प्रतिक्रिया आल्या तेव्हा तेव्हा त्यांनी “आम्ही आजवर कुणालाही न सांगू शकणारे विषय, मुद्दे आणि भावना या सर्वेक्षणाच्या निमित्ताने व्यक्त केल्या आहेत, ही संधी दिल्याबद्दल विविध वयोगटातील महिलांनी आनंद व्यक्त केला आहे.

या विषयाचा व्याप, विस्तार आणि पैसदेखील फार मोठा असल्याची संपूर्ण जाणीव अभ्यासकांना आहे. परंतु याविषयाची गरज ही निर्विवाद आहे. हे लक्षात घेवून हे सर्वेक्षण करण्यात आले.

तरुणांचे व किशोरवयीन मुलांचे शिक्षण, जागरण आणि स्वजाणिवांचा विकास करण्याकरीता अभ्यासातील निष्कर्षांचा उपयोग करणे हा मुख्य उद्देश आहे.

या अभ्यासाचा आधार घेऊन विविध वयोगटांसाठी स्वतंत्रपणे मॉड्युल्स बनविले जातील. ज्याद्वारे नवतरुणांनी समाजात वावरताना स्वतःची कशी सुरक्षा करावी तसेच जेष्ठ किंवा मोठ्या वयाच्या महिलांनी स्वतःला व पुढील पिढीला कसे जपावे, समजवावे हे शिकविले जाईल. तसेच छेडछाड, लैंगिक अत्याचार किंवा मानहानीची घटना महिलेच्या आयुष्यात घडलीच तरी त्याचा परिणाम आणि पडसाद पुढील आयुष्यात पडू न देण्याचे स्किल(कौशल्य) सुद्धा या अभ्यासप्रक्रियेतून शिकविले जाईल.

या सर्वेक्षणात प्रामुख्याने महाराष्ट्रात राहणाऱ्या मुली व स्त्रिया यांचा अभ्यास करण्यात आला. याकरिता संपूर्ण महाराष्ट्रातून फॉर्म भरले गेले. सोलापूर, कोल्हापूर, गोंदिया, अहमदनगर, ठाणे, गडचिरोली, नाशिक, पुणे, वर्धा, यवतमाळ, भंडारा, गडचिरोली, मुंबई, चंद्रपूर, नागपूर, नांदेड, पनवेल, अकोला यासह मध्यप्रदेश, कर्नाटक, पंजाब, हरियाणा, अंदमान अशा विविध राज्यातून एवढेच नव्हे तर ऑस्ट्रेलिया, स्वीडन अशा देशातूनही अनेकींनी आपले मत नोंदवणारे सर्वेक्षण पत्रक भरले. परंतु असा दस्तावेज जमा करताना फॉर्म भरणाऱ्या महिला अथवा मुलीचे मूळ हे महाराष्ट्रात असले पाहिजे असा भौगोलिक निर्बंध अभ्यासकर्त्यांनी घातला होता.

या संपूर्ण प्रक्रियेत कुठल्याही महिला/मुलीला स्वतःचे नाव, पत्ता, ओळख सांगण्याची गरज नव्हती. त्यामुळे या महिला अधिक मोकळेपणाने हा फॉर्म भरू शकतील असा अंदाज होता. याबाबत काही निरीक्षणे पुढच्या भागात येतीलच, परंतु घडून गेलेल्या घटनेबाबत किंवा छेडछाड, अपमान, धमकी, बलात्कार अशा कुठल्याही प्रकारे स्वतःवर झालेल्या अन्यायाबद्दल आजही मोकळेपणाने समाजात बोलण्याची मानसिकता अद्याप महिलांची नाही. खरेतर अन्याय करणारा व्यक्ती हा स्वतः दोषी आहे, अशी सत्यपरिस्थिती असताना महिला मात्र झालेल्या कृत्याकरिता किंवा घटनेकरिता स्वतःलाच जबाबदार मानतात. ही जबाबदारी अथवा त्याचे ओझे आयुष्यभर मनावर घेऊन कुढत राहतात.

अनेक वयस्कर महिलांनी हा फॉर्म भरण्याचे टाळले. आता उतरत्या वयात कशाकरिता या घडून गेलेल्या नकोशा घटना आठवाव्यात, असे त्यांना वाटले. जे घडून गेले ते नुसते आठवले तरीसुद्धा येणारी अस्वस्थता त्यांना पुन्हा अनुभवायची नव्हती.

याउलट माझ्या अनुभवांचा फायदा किंवा त्यातून काही मार्गदर्शन पुढच्या पिढीला मिळाले तर हे उत्तमच असेल, असे म्हणणाराही वर्ग होता. त्यांनी अत्यंत मोकळेपणाने हा फॉर्म भरला असल्याची खात्री आहे.

याशिवाय काही जणींनी असे अनुभव येऊनही ते फॉर्ममध्ये लिहिण्याचे टाळले. साधारणतः 30 ते 35 टक्के महिलांनी आम्ही असे अनुभव घेतलेच नाही असे उत्तर फॉर्म मध्ये लिहिले असले तरीसुद्धा काही उपप्रश्न आहेत, ज्यात त्यांनी त्यांच्यावर झालेल्या लैंगिक छेडछाडीचा पुसटसा उल्लेख केला आहे. याचे विवेचन आम्ही प्रश्नाच्या अनुषंगाने पुढे केले आहेच. पण या मानसिकतेला दोष देण्याचे अभ्यासक म्हणून टाळले. यामागे समाजाचे दडपण आणि असे अनुभव व्यक्त न करण्याचे संस्कार कारणीभूत आहेत, हे समजून घेतले.

या फॉर्मचा दुसरा भाग महिलांना कायद्याची माहिती आहे का यावर होता. या अभ्यासाच्या निष्कर्षातून समाजात का यदे, प्रशासन आणि सुव्यवस्था याबाबत मोठ्या प्रमाणात अज्ञान असल्याचे लक्षात आले. कायदा बनतो, योजनाही येतात पण ज्यांच्यासाठी त्या बनल्या आहेत, त्यांना त्याचा लाभ घेता येत नाही. कारण त्या लोकापर्यंत पोहोचतच नाही. त्याचा पूर्णार्थाने प्रचार-प्रसार, जनजागरण करायला हवे. हे या अभ्यासाच्या अनुषंगाने लक्षात आले. आणि यातून महिला अत्याचार प्रतिबंधाबद्दल बोलणारा आणि त्यांच्या स्वजाणिवा विकसित करणारा असा हा अत्यंत महत्वाचा अभ्यास ठरेल, हे जाणविले.

कायदा-सुव्यवस्था याबाबत जाणीव जागृती करण्याची जबाबदारी शासन व प्रशासनाबरोबरच सामाजिक संस्थाचीही आहे, त्यासाठी त्यांनी अधिक का र्य केले पाहिजे हे लक्षात आले. पुढील दस्तावेजात एकेका प्रश्नाच्या अनुषंगाने आपण विविध आयाम बघणार आहोतच, परंतु या दस्तावेजाचा उपयोग समाजाच्या हितासाठी करावा म्हणून WE 4 CHANGE या संस्थेने पुढाका र घेवून बदलाचे वारकरी होण्याकरिता पाऊल उचलले आहे.

**संशोधन पद्धती-** या सर्वेक्षणासाठी दोन्ही गटातून प्रत्येकी 300 सॅम्पल साईज ठेवून फॉर्म भरून घेण्यात आले. यात 18 ते 25 वयोगटात एकूण 304 आणि 26 ते

पुढील वयोगटात एकूण 305 असे एकूण 609 फॉर्म साधारण दोन महिन्याच्या कालावधीत भरून घेण्यात आले. महाराष्ट्र, छत्तीसगढ, मध्यप्रदेश, कर्नाटक, पंजाब, हरियाणा, अंदमान अशा विविध राज्यातून एवढेच नव्हे तर ऑस्ट्रेलिया स्वीडन येथूनही गुगल फॉर्म द्वारे प्रश्नावली भरून घेण्यात आली.

**उद्दिष्ट** - आधारभूत सर्वेक्षण व अभ्यासातून विद्यार्थीनी व महिला यांच्यासाठी अत्याचारविरोधात जनजागरण का र्यक्रम घेणे. या प्रश्नावलीत महिलांच्या सामाजिक, आर्थिक, लैंगिक आणि भावनिक सद्यस्थितीबद्दल आढावा घेणे, तत्का लीन व सद्यस्थितीतील परिस्थिती समजावून घेणे हा उद्देश आहे व जुन्या व नव्या पिढीच्या अनुभवांचा तौलोनिक अभ्यास करणे हा सुद्धा आहेच.

## सहवेदना सर्वेक्षणातून आलेल्या निष्कर्षांचे विश्लेषण-

### भाग १ : महिला सुरक्षा आणि समानता

#### 1. भौगोलिक विभाग व आर्थिकस्तर

प्रामुख्याने महाराष्ट्रात जन्मलेल्या पण विविध कारणांनी मध्यप्रदेश, कर्नाटक, पंजाब, हरियाणा, अंदमान अशा विविध राज्यातून एवढेच नव्हे तर ऑस्ट्रेलिया, स्वीडन अशा देशातून राहणाऱ्या महिलांनीही फॉर्म भरले आहेत. संपूर्ण महाराष्ट्रातील एकूण 609 फॉर्म भरले गेले. याचा अत्यंत आनंद आहे. सोलापूर, कोल्हापूर, गोंदिया, अहमदनगर, ठाणे, गडचिरोली, नाशिक, पुणे, वर्धा, यवतमाळ, भंडारा, मुंबई, चंद्रपूर, नागपूर, नांदेड, पनवेल, अकोला या जिल्ह्यातील महिलांनी आपला सहभाग नोंदवला आहे. काही शहरातल्या वस्ती आणि प्रभाग यावरून असे लक्षात येते की आर्थिक दृष्ट्या अत्यंत मागास अशा वर्गाचे प्रतिनिधित्वही याठिकाणी झाले आहे. त्याचप्रमाणे मध्यमवर्गीय आणि उच्च मध्यमवर्गीय वस्तीतील रहिवासी महिलांनी सुद्धा आपली मते नोंदवली आहेत. हा मुद्दा याकरता महत्त्वाचा आहे, की असे म्हटले जाते की, मागासभागात अथवा समाजाच्या एका विशिष्टस्तरात मोठ्या प्रमाणात अन्याय-अत्याचार होतात. परंतु यात असे आढळून आले की जेथे जेथे स्त्रीवर्ग आहे तेथे तेथे कोणत्या कोणत्या ना कोणत्या प्रकारे महिलेला, मुलीला अथवा वृद्ध स्त्रीला सुद्धा मानहानी, लैंगिक अत्याचार, अपमान, अन्याय याला सामोरे जावे लागले आहे, लागत आहे.

**2. वयोगट -** गटात 18 ते 25 व 25 वर्षावरील गट पाडण्यात आले. तसेच 26 वर्षावरील खुल्या वयोगटात 25 ते 60 वर्षावरील महिलांचा समावेश करण्यात आला. पहिला गट हा विद्यार्थीनींचा तर दुसरा गट हा सर्वसमावेश असेलेल्या महिलांचा आहे. ज्यात 25 च्या पुढच्या वयोगटाच्या महिला आहेत.

| **वय वर्ष 18 ते 25** | | **वय वर्ष 25 च्या पुढे** | |
|---|---|---|---|
| 18 ते 20 | 50.3% | 25 ते 35 | 50.1% |
| 21 ते 25 | 43.8% | 36 ते 45 | 43.7% |
| 25 च्यावर | 5.9% | 46 ते 60 | 4.9% |
| | | 60 च्यावर | 1.3% |

सर्वेक्षणात प्रामुख्याने दोन गट पाडण्यात आले. त्यात विद्यार्थी गटात वय वर्षे 18 ते 25 तर खुल्या गटात 25 वर्षांवरील महिलांचा समावेश करण्यात आला. सहभागी वयोगटाचीसुद्धा तीन गटात वर्गवारी करण्यात आली. 60 वर्षांवरील महिला हे सर्वेक्षण पत्रक भरण्यास उदासीन असल्याचे लक्षात आले. केवळ 1.3 टक्के महिलांनी ज्यांना सीनियर सिटीजन म्हणजेच जेष्ठ नागरिक असे म्हटल्या जाते अशांनी हे सर्वेक्षण भरले आहे. म्हणजेच 305 पैकी केवळ 4 फॉर्म हे या वयोगटातील आहे. खरेतर या वयोगटापर्यंत मोठ्या प्रमाणात पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु, अनिच्छा, सामाजिक दायित्वाबाबतची उदासीनता आणि सामाजिक दडपण या कारणाने ज्येष्ठ वयोगटात फॉर्म भरले नसल्याचे त्यांच्याशी केलेल्या प्रत्यक्ष समाजात संवादात लक्षात आले.

3 : **आर्थिकस्तर**

| **आर्थिकस्तर** | **टक्केवारी** |
|---|---|
| साधारण | 16.7% |
| मध्यमवर्ग | 63% |
| उच्चमध्यमवर्ग | 20% |
| श्रीमंत | 0.3% |

दोन्ही गटातीलपैकी एक गट विद्यार्थ्यांचा असून दुसरा गट साधारण, मध्यमवर्ग, उच्चमध्यमवर्ग, उच्चमध्यमवर्ग, श्रीमंत अशी वर्गवारी आहे.

**4. सामाजिक ओळख :**

| **सामाजिक परिचय** | **टक्केवारी** |
|---|---|
| विवाहित | 80.6% |
| अविवाहित | 18.4% |
| लीव इन रीलेशन | 0% |
| अन्य | 1% |

**(टीप :** 18 ते 25 वर्ष वयोगटात सामाजिकस्तर विद्यार्थी असा गृहीत धरण्यात आला आहे.)

सर्वेक्षणाच्या पहिल्या गटातील 304 महिला म्हणजे एकूण सर्वेक्षणाच्या 50 टक्क्यांच्यावर महिला विद्यार्थी या प्रारूप गटात मोडतात. याशिवाय दुसऱ्या वयोगटातील 80.6 टक्के महिला या विवाहित आहेत तर 18.4 टक्के महिला या अविवाहित आहेत. या गटात लिव्ह इन रिलेशनशिप हा एक पर्याय दिला असला तरी या गटाचे प्रतिनिधित्व कुणी केलेले नाही. किमान तसे नमूद केले नाही. परंतु, मोठ्या वयोगटातील 305 फॉर्म

पैकी एकूण तीन फॉर्म म्हणजे 1 टक्के महिलांनी विवाहित-अविवाहित-लिव इन रिलेशनशिप हा सामाजिक परिचय सोडून अन्य स्तरातील प्रतिनिधित्व केले आहे. संपूर्ण सर्वेक्षणाच्या 1 टक्के का होईना पण अशाप्रकारच्या वर्गाचे प्रतिनिधित्व या अभ्यासात झाले हे सामाजिक बदलाचे द्योतक असल्याचे म्हणता येईल.

**प्रश्न क्र. 5 :- आपण आपल्या जीवनात एक मुलगी म्हणून अपमान/अन्याय अनुभवला आहे का?**

| **वयवर्ष 18 ते 25** | | **वयवर्ष 25 च्यापुढे** | |
|---|---|---|---|
| छेडखानी | 26% | छेडखानी | 31.1% |
| पुरुषाकडून धमकी | 9.2% | पुरुषाकडून धमकी | 10.8% |
| स्त्री म्हणून झालेली मारहाण | 3.6% | स्त्री म्हणून झालेली मारहाण | 4.9% |
| स्त्री म्हणून असुरक्षितता | 20.1% | स्त्री म्हणून असुरक्षितता | 12.1% |
| मुलगी आहे म्हणून संधी न मिळणे | 18.8% | मुलगी आहे म्हणून संधी न मिळणे | 14.4% |
| चांगल्या-वाईट दिसण्यावर टिप्पणी | 31.6% | चांगल्या-वाईट दिसण्यावर टिप्पणी | 31.8% |
| कधीच अन्याय अपमान अनुभवला नाही | 35% | कधीच अन्याय अपमान अनुभवला नाही | 35.1% |

18 ते 25 वयोगटातील 65 टक्के मुलींना अन्यायाचा (मारहाण, पुरुषांकडून धमकी, संधी न मिळणे, असुरक्षितता, बॉडी शेमींग आदी) या गोष्टींचा सामना करावा

लागतो. निव्वळ ती स्त्री आहे म्हणून महिलांना विविध प्रकारच्या अन्यायाचा सामना करावा लागतो. 18 ते 25 वयोगटातील विद्यार्थिनींनी आपले मत नोंदवताना 35 टक्के मुलींनी कधीच अन्याय अपमान अनुभवला नाही, असे सांगितले तर छेडखानीचा अनुभव 26 टक्के विद्यार्थिनी घेतला आहे. त्याचबरोबर 31.6 टक्के मुलींनी चांगले-वाईट दिसण्यावरून टिपणी अनुभवली आहे. स्त्री म्हणून भीती अथवा असुरक्षित वाटणे याचा सामना 20.1 टक्के मुलींना करावा लागतो तर मुलगी म्हणून संधी न मिळणे हे 18.8 टक्के मुली अनुभवतात. पुरुषांकडून धमकी हे 9.2 टक्के मुलींनी अनुभवले आहे तर 18 ते 25 वयोगटात स्त्री म्हणून मारहाण ही 3.6 टक्के मुलींनी अनुभवली आहे.

**25 वर्षा पुढे** असणाऱ्यांचे 64.9 टक्के महिलांना एक स्त्री असल्याने विविध प्रकारच्या अन्यायांचा सामना करावा लागतो. दोन्ही गटात साधारण केवळ 35 टक्के महिला व मुलींनी अन्याय अत्याचार अनुभवला नाही असे म्हटले आहे. म्हणजे सुमारे 65 टक्के महिलांना विविध अन्याय-अत्याचाराला सामोरे जावे लागले. आपण आपल्या जीवनात एक मुलगी म्हणून अपमान/अन्याय अनुभवला आहे का या प्रश्नाचे उत्तर 25 ते पुढील वयोगटातील एकूण 35.1 टक्के महिलांनी नाही असे दिले आहे. पण, त्याचबरोबर उर्वरित 31.1 टक्के महिलांनी छेडखानी तर 31.8 टक्के महिलांनी चांगल्या-वाईट दिसण्यावरून अपमान अनुभवल्याचे सांगितले आहे. मुलगी आहे म्हणून संधी न मिळणे हा अनुभव 14.4 टक्के तर स्त्री म्हणून असुरक्षितता असल्याचा अनुभव 12.1 टक्के महिलांनी घेतला आहे. 10.8 टक्के महिलांनी पुरुषांकडून धमकी अनुभवली असून 4.9 टक्के महिलांनी स्त्री म्हणून मारहाण झाल्याचे सांगितले आहे.

**तुलनात्मक अध्ययन :** या प्रश्नाचा विचार करता असे लक्षात आले की, जुन्या पिढीत ज्याप्रमाणे चांगल्या वाईट दिसण्यावरून टिप्पणी होत होती. त्याच समप्रमाणात आजच्या काळातही विद्यार्थिनी हे अनुभवत आहेत. छेडखानी या प्रकारात ज्येष्ठ वयोगटातील महिला मोठ्या प्रमाणात बळी आहेत. त्या तुलनेत विद्यार्थी गटात कमी प्रमाणात हा अनुभव घेत आहेत. आजच्या काळात मुले-मुली सहशिक्षण घेत असल्याने छेडखानी या प्रकाराला आळा बसला असण्याची शक्यता आहे. कधीच अन्याय-अपमान अनुभवला नाही असे म्हणणाऱ्या महिलांची आकडेवारी दोन्ही गटात समानच आहे.

**निष्कर्ष :** ठळकपणे जाणवणारा एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे स्त्री म्हणून असुरक्षितता ही नव्या काळातील महिलांना अधिक वाटते. हे प्रमाण 12.1 टक्के पासून वाढून विद्यार्थी गटात 20.1 टक्के झाले आहे.

**प्रश्न क्र. 6:- पुरुषाद्वारे झालेला नकोसा स्पर्श (बॅड टच) पहिल्यांदा वयाच्या कोणत्या वर्षी प्रथम अनुभवला?**

| **वयवर्ष 18 ते 25** | | **वयवर्ष 25 च्या पुढे** | |
|---|---|---|---|
| 1 ते 5 वर्षे | 2.3% | 1 ते 5 वर्षे | 1.3% |
| 6 ते 10वर्षे | 12.2% | 6 ते 10वर्षे | 13.8% |
| 11 ते 16 वर्षे | 26% | 11 ते 16 वर्षे | 30.8% |
| 18 ते 25 वर्षे | 18.4% | 18 ते 25 वर्षे | 17.7% |
| 25 वर्षानंतर | 1.4% | 25 वर्षानंतर | 4.9% |
| कधीच अनुभवला नाही | 39.9% | कधीच अनुभवला नाही | 31.5% |

**वयवर्षे 18 ते 25 :** वयोगट 18 ते 25 या गटातील 39.9 टक्के मुलींनी नकोसा स्पर्श कधीच अनुभवला नाही यावरून असे अनुमान निघते की 60.1 टक्के मुलींनी असा अनुभव कधी ना कधी घेतला आहे. 11 ते 16 या वयोगटात हे प्रमाण सगळ्यात जास्त म्हणजे 26 टक्के आढळून येते. वय वर्ष सहा ते 25 या वयोगटातील मुलींना बॅड टचचा सामना सगळ्यात जास्त करावा लागतो (इथे बॅड टच म्हणजे पाण्याचा ग्लास घेताना केल्या गेलेला ओझरता स्पर्श, बस मधील पुरुषाचा नकोसा स्पर्श, मुलाने जबरदस्तीने हात पकडणे, जबरदस्ती शरीरावर हात फिरवणे हे आणि असे सर्व स्पर्श येतात.)

**25 वर्षांच्या पुढे :** 31.5 टक्के स्त्रियांनी नकोसा स्पर्श कधीच अनुभवला नाही यावरून असे लक्षात येते की 69.5 टक्के महिलांनी असा अनुभव कधी ना कधी घेतला आहे. 25 वर्षांनंतर बॅड टच अनुभवण्याचे प्रमाण अगदी कमी म्हणजे 4.9 टक्के आढळून येते. याचे कारण शोधले असता मुलींचा दुबळेपणा कमी होतो किंवा त्या हुशारीने आल्या परिस्थितीला हुलकावणी देऊ शकतात, असा निघू शकतो. या वयोगटात सुद्धा वय वर्ष 6 ते 25 पर्यंत महिलांना नकोशा स्पर्शाचा अनुभव जास्त प्रमाणात आला आहे. 25 वर्षांनंतर हे प्रमाण कमी होते. 30.8 टक्के महिलांनी 11 ते 16 वर्ष या वयात नकोसा स्पर्श अनुभव घेतला असल्याचे सांगितले आहे. 25 वर्ष ते पुढील वर्षे वयोगटातील 13.8 टक्के महिलांनी 6 ते 10 या वयोगटात नकोसा स्पर्श अनुभवला आहे.

**तुलनात्मक अध्ययन :** 18 ते 25 वयोगटातील 2.3 टक्के मुलींनी आपल्या वयाच्या 1 ते 5 वर्षांत अनुभवला आहे तर 25 वर्षांवरील 1.3 टक्के महिलांनी याच वयात असा अनुभव घेतला आहे. यावरून असे लक्षात येते की, पूर्वीपेक्षा आजच्या काळात हा अनुभव 1 ते 5 वयोगटात अबोध बालिका दुपटीने घेत आहेत, हे भीषण आहे. उर्वरित महिलांनी त्याखालोखाल 18 ते 25 वयोगटातील असा स्पर्श अनुभवल्याचे दोन्ही गटात सांगण्यात आले आहे. तर 18 ते 25 वयोगटातील 12.2 टक्के विद्यार्थिनींनी हा स्पर्श 6 ते 10 वयोगटात अनुभवला आहे.

**निष्कर्ष :** 60 टक्के मुलींना बॅड टचचा सामना कधी ना कधी करावा लागला आहे ही एक चिंताजनक बाब आहे. यासाठी मुलींना पाचव्या वर्षांपासूनच बॅड टच म्हणजे काय याची समज देणे आवश्यक आहे. तसेच असे काही झाल्यास त्या काय करू शकतात याचे काही पर्यायही त्यांना समजावून सांगणे आवश्यक ठरते. अशी काही घटना झाल्यास आपल्या पाठीशी कुणी तरी मोठे आहे याची खात्री असल्यास मुली अशा परिस्थितीचा सामना समर्थपणे करू शकतील आणि पुढे येणारे मोठे येणारे संकट टळू शकेल तसेच 11 ते 16 वर्ष हे आयुष्यातील शारीरिक व मानसिक जडण घडणीची महत्त्वाचे वर्षे असतात, याच काळात ज्या मुली नकोशा स्पर्शाला सामोरे जातात त्यांचे प्रमाण लक्षात घेण्याजोगे आहे.

**प्रश्न क्र. 7:- आपणास नकोसा स्पर्श करणाऱ्या व्यक्तीचा वयोगट काय असावा?**

| **व्यक्तीचा वयोगट** | **टक्केवारी** |
|---|---|
| 12 ते 17 वर्षे | 5.2% |
| 19 ते 25वर्षे | 13.8% |
| 26 ते 35वर्षे | 23.3% |
| 36 ते 50वर्षे | 26.6% |
| 51 ते 60वर्षे | 7.5% |
| 60च्यावर | 2.6% |
| अनुभव नाही | 32.5% |

हा प्रश्न केवळ 25 वर्ष वयोगटातच विचारण्यात आला होता. त्यापैकी 67.5 टक्के महिलांनी विविध वयोगटातील पुरुषांकडून नकोसा स्पर्श अनुभवला आहे. यातही 36 ते 50 वर्षातील पुरुषांद्वारे असा अनुभव महिलांनी सर्वाधिक प्रमाणात घेतला आहे. त्या खालोखाल 25 ते 35 वयोगटातील पुरुषांनी असा अनुभव दिला आहे. यात असेही म्हणता येऊ शकते की, व्यक्तिगत जीवनातील असमाधान, नैराश्य, असंतुष्टता असलेल्या व्यक्तीद्वारे असे अनुभव येत असावेत.

**निष्कर्ष :** याचाच अर्थ असाही होतो की वय वाढते तशी पुरुषाची हिम्मत वाढते. बॅड टच केल्यास चूप बसेल आणि आपले विरुद्ध काही बोलणार नाही अशी मुलगी शोधणे त्यांना सहज जमते. आदरयुक्त भीतीमुळे ती मुलगी काही बोलणार नाही आणि घरच्यांना सांगितलं तर ते आपल्यावर विश्वास ठेवणार नाही अशी खात्री असलेली मुलगी या वयोगटातल्या पुरुषांना चांगली जोखता येते असे दिसते. 'तू जर घरच्यांना सांगितले तर कोणी विश्वास ठेवणार नाही,' हे मुलीला पटवून देणे किंवा मुलीला धमकावणे त्यांना सहज जमत असावे.

**प्रश्न क्र.** 8:- **आपण अनुभवलेला नकोसा स्पर्श (बॅड टच) कुणाकडून होता?**

| **वयवर्ष 18 ते 25** | | **वयवर्ष 25 च्यापुढे** | |
|---|---|---|---|
| अनोळखी | 39.5% | अनोळखी | 31.8% |
| वडील/सख्खाभाऊ | 1.7% | वडील/सख्खाभाऊ | 1.3% |
| नातेवाईक (का का /मामा/आजोबा इ.) | 9.2% | नातेवाईक (काका /मामा/आजोबा इ.) | 13.4% |
| शेजारी | 12.2.% | शेजारी | 10.8% |
| शिक्षक | 1.3% | शिक्षक | 1.6% |
| सहप्रवासी | 9.5% | सहप्रवासी | 17.7% |
| परिचीत | 6.9% | परिचीत | 14.4% |
| सहाध्यायी/ मित्र | 2.6% | सहाध्यायी/ मित्र | 0.7% |
| अनुभव नाही | 39.2% | अनुभव नाही | 31.5% |

**वयवर्षे 18 ते 25** या गटात नकोसा स्पर्श अनुभवलेल्या महिलांचे प्रमाण 60.8 टक्के आहे. नकोसा स्पर्श आपणास कुणाद्वारे झाला या पूर्वस्मृतींना जागवणाऱ्या प्रश्नांचे उत्तर देताना 18 ते 25 वयोगटातील 39.2 टक्के विद्यार्थिनींनी अनुभव नसल्याचे सांगितले. परंतु, तेवढ्याच संख्येने म्हणजे 39.5 टक्के मुलींनी अनोळखी व्यक्तीकडून असा स्पर्श झाल्याचे सांगितले. प्रवासादरम्यान 9.5 टक्के मुली या अनुभवाला सामोरे गेल्या आहेत. तसेच फारसे जवळचे नसलेले ज्यांना केवळ परिचित म्हणता येईल अशा, 6.9 टक्के व्यक्तींनी मुलींना कोवळ्या वयात नकोसा स्पर्श केला आहे. शेजारी म्हणवणाऱ्या व्यक्तींकडून 12.2 टक्के तर त्या खालोखाल काका -मामा-आजोबा या विश्वासू नात्यातून 9.2 टक्के मुलींनी नकोसा स्पर्श अनुभवला आहे. यात

1.7 टक्के वडील व सख्खा भाऊ ही रक्ताची नाती सुद्‌धा आहेत. आदरस्थानी असलेल्या शिक्षक या नात्यातून 1.3 टक्के मुलींना अशा अनुभवाला सामोरे जावे लागले आहे.

**25 वर्षांच्या पुढे :** या गटात नकोसा स्पर्श अनुभवलेल्या महिलांचे प्रमाण 68.5 टक्के आहे तर असा अनुभव नसलेल्या महिलांचे प्रमाण 31.5 टक्के आहे. असे असले तरी याच्या समांतर 31.8 टक्के महिलांनी अनोळखी व्यक्तीकडून नकोसा स्पर्श झाल्याचे सांगितले आहे तर सहप्रवाश्यांनाकडून असा अनुभव घेणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण 17.7 टक्के आहे. परिचित व्यक्तींकडून 14.4 टक्के, नातेवाईकांकडून 13.4 टक्के, शिक्षक 1.6 सख्खा भाऊ/ वडील 1.3 टक्के, शेजारी 10.8 टक्के अशी आकडेवारी 25 वर्ष वयोगटावरील महिला देतात.

**तुलनात्मक अध्ययन :** अनोळखी व्यक्तींनी केलेला नकोसा स्पर्श हा 25 वर्षावरील वयोगटात 31.8 टक्के महिलांनी अनुभवला तर हे प्रमाण विद्‌यार्थी गटात वाढून 39.5 टक्के असल्याचे निदर्शनास आले. नव्या पिढीत अनोळखी व्यक्ती, शेजारी तसेच सहअध्यायी मित्र यांच्याकडून नकोसा स्पर्श होण्याची आकडेवारी ही वाढलेली दिसते. तसेच पूर्वीच्या काळी परिचित व्यक्तींकडून 14.4 टक्के नकोसा स्पर्श अनुभवलेली पिढी ही 25 वर्ष वयोगटावरील असून 18 ते 25 वयोगटातील 6.9 टक्के मुली हा अनुभव घेत आहेत, म्हणजेच परिचितांद्‌वारे होत असलेला नकोसा स्पर्श आता कमी प्रमाणात आकडेवारी दाखवीत आहे. हे कुटुंबात जागरूकता वाढल्याचे लक्षण आहे.

**निष्कर्ष :** नकोसा स्पर्श अनुभवण्याचे प्रमाण नवीन पिढीत काही प्रमाणात कमी झाले असले (7.7 टक्क्यांनी) तरी अनोळखी व्यक्ती, शेजारी, वडील, सख्खा भाऊ, मित्र या सगळ्यांकडूनच वाईट अनुभव येण्याचे प्रमाण वाढले आहे तर परिचितांकडून व नातेवाईकांकडून असे अनुभव कमी होत आहे. हे प्रमाण निम्म्यावर आल्याचे आकडेवारी नुसार कळते. यामागे विचार केला असता कुटुंबातील सुशिक्षित आई-वडिलांचे प्रमाण, लहान कुटुंब तसेच सजग पालकत्व हे कारण असू शकते असा निष्कर्ष आहे.

सार्वजनिक स्थळी मुली सगळ्यात जास्त असुरक्षित असल्याचे दोन्ही गटात लक्षात येते ही गंभीर बाब आहे. बॅड टच हा मुलींना सगळ्यात जास्त अनोळखी व्यक्तींकडून होतो. याचाच अर्थ प्रवासात, सार्वजनिक स्थळी, शाळा-कॉलेज, क्लासमध्ये मुलींना असा

अनुभव जास्त येत असावा असे दिसते. म्हणजे जिथे अनोळखी व्यक्ती भेटतात त्या जागा सुरक्षित नाहीत. अनोळखी व्यक्ती या सार्वजनिक स्थळी जास्त भेटतात. त्यामुळे सार्वजनिक स्थळ आणि कामाचे ठिकाण मुलींकरिता सुरक्षित नाही, हे पुन्हा एकदा सिद्ध होते.

**प्रश्न क्र. 9:- नकोसा स्पर्श / छेडखानी अनुभवल्यावर आपल्या मनात कोणत्या भावना उत्पन्न झाल्या?**

| **वयवर्ष 18 ते 25** | | **वयवर्ष 25च्या पुढे** | |
|---|---|---|---|
| संताप/ राग | 42.8% | संताप/ राग | 39.7% |
| आनंद | 1.3% | आनंद | 1% |
| चीड | 35.8% | चीड | 22.3% |
| लाज | 9.9% | लाज | 9.2% |
| अपमान | 16.4% | अपमान | 14.8 |
| भीती | 33.6% | भीती | 27.8% |
| अस्वस्थता | 19.7% | अस्वस्थता | 31.1% |
| अबोल होणे/ कुणाशी न बोलावेसे वाटणे | 14.8% | अबोल होणे/ कुणाशी न बोलावेसे वाटणे | 9.2% |
| काहीच नाही | 10.2% | काहीच नाही | 0.7% |
| अनुभव नाही | 24.3% | अनुभव नाही | 29.5% |

**18 ते 25 वयोगट :** नकोसा स्पर्श /छेडखानी अनुभवल्यानंतर मनात कोणत्या भावना उत्पन्न झाल्या हे सांगताना 18 ते 25 वयोगटातल्या 42.8 टक्के मुली या संताप, राग, क्रोध अशी भावना निर्माण झाल्या असे सांगतात. तसेच 33.6 टक्के मुली मनात भीती उत्पन्न झाल्याचे सांगतात. खालोखाल 35.8 टक्के मुलींना चीड उत्पन्न झाली. 19.7 टक्के मुलींनी अस्वस्थता अनुभवली. 16.4 टक्के मुलींनी अपमानाची भावना अनुभवली तर अबोल होणे, कुणाशी बोलावेसे न वाटणे ही परिस्थिती 14.8 टक्के मुलींनी अनुभवले. 9.9 टक्के मुलींना लाज वाटली तर 10.2 टक्के मुलींना काहीच वाटले नाही म्हणजेच त्या आपल्या भावना ओळखू शकल्या नाही अथवा त्यांना त्यांच्या भावना व्यक्तच करता आल्या नाही, असे असू शकते.

**25 वर्षांपुढे :** वय वर्ष 25 च्या पुढे 29.5 टक्के महिलांनी छेडखानी झाल्यानंतर कुठली भावना मनात उद्‌भवते याचा अनुभव नसल्याचे म्हटले आहे. 39.7 टक्के महिलांनी मनात संताप-राग, 31.1 टक्के महिलांनी अस्वस्थता, 27.8 टक्के महिलांना भीती तर 22.3 टक्के महिलांनी मनात चीड उत्पन्न झाल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे 14.8 टक्के महिलांनी नकोसा स्पर्श झाल्यानंतर अपमान झाल्याचे अनुभवले असे सांगितले. 9.2 टक्के महिलांनी अबोल होणे तर 9.2 टक्के लाज वाटल्याचे सांगितले. 0.7 टक्के महिलांनी काहीच भावना निर्माण न झाल्याचे नमूद केले आहे तर 1 टक्के महिलांनी आनंद अनुभवल्याची नोंद केली आहे.

**तुलनात्मक अध्ययन :** या प्रश्नांचा अभ्यास करताना समाजात बराच बदल झाल्याचे जाणवले. दोन पिढ्यांतील वैचारिक अंतर सुद्‌धा लक्षात आले. नव्या पिढीत चीड, अपमान यासारख्या भावना स्व जाणिवेच्या भूमिकेतून वाढीस लागल्या. मात्र, काहीच न वाटणे, अबोल होणे, कुणाशी बोलावेसे न वाटणे या भावना जुन्या पिढीच्या तुलनेत नव्या पिढीत अधिक टक्केवारीने दिसतात. या मुद्‌यात काळजीची बाब ही आहे की, समाजात व्यक्त न होता येणे अथवा पूर्वीसारखे व्यक्त व्हावे अशी जागा न मिळणे हे सुद्‌धा एक कारण त्यामागे असण्याची शक्यता आहे.

**निष्कर्ष :** छेडखानी झाल्यानंतर मनात संताप चीड वाटणे. अपमान, भीती, अस्वस्थता, अबोल होणे अशा प्रकारची भावना निर्माण झाल्याचे सर्वेक्षणात सांगितले

आहे. या अभ्यासात दोन वयोगटांच्या प्रतिक्रियांचे निरीक्षण करता असे लक्षात आले की, आजच्या पिढीत छेडखानी अनुभवल्यानंतर संताप, राग आणि क्रोध या भावना निर्माण होतात व त्याच्या पाठोपाठ भीती ही भावना निर्माण होते. परंतु, ज्येष्ठ पिढी मनात नकोसे स्पर्श/छेडखानी अनुभवल्यावर मनात संतापाची भावना व त्यापाठोपाठ अस्वस्थता व त्यानंतर भीती निर्माण झाली असे आकडेवारीनुसार कळते. या आकडेवारीतून महत्त्वाचे निरीक्षण म्हणजे छेडखानी अनुभवल्यानंतर मनात अस्वस्थता असण्याचे प्रमाण विद्यार्थी गटात कमी झाले असले तरी अबोल होणे व कुणाशी बोलावेसे न वाटणे ही भावनिक स्थिती वाढते. नव्या काळात मुली व्यक्त होत नाहीत की का य असे वाटते. त्याची सामाजिक अंगाने अनेक कारणे असू शकतात. त्याचाही विचार करणे गरजेचे आहे. अजून एक असे लक्षात आले की, 10.2 टक्के 18 ते 25 वयोगटातील मुलींनी नकोसा स्पर्श/छेडखानी अनुभवल्यावर मनात कोणत्याही भावना उत्पन्न न झाल्याचे सांगितले म्हणजे काहीच वाटले नाही असे सांगितले. या उलट 25 ते पुढील वयोगटात काहीच न वाटण्याचे प्रमाण केवळ 7 टक्के असल्याचे आढळले. यावरून असे म्हणण्यास वाव आहे की, नव्या पिढीत छेडखानी/ नकोसा स्पर्श हा होणारच असे दुर्दैवाने स्वीकारले असावे, म्हणूनच अशा प्रकारच्या अन्यायानंतरही मनातील कोणत्याही भावना त्या ओळखू शकल्या नसाव्यात.

Change

**प्रश्न क्र. 10 :- पुरुषाकडून नकोसा स्पर्श आपण आजवर कितीदा अनुभवला?**

| **वयवर्ष 18 ते 25** | | **वयवर्ष 25 च्यापुढे** | |
|---|---|---|---|
| 1 वेळा | 29.3% | 1 वेळा | 27.2% |
| 2 ते 5 वेळा | 22% | 2 ते 5 वेळा | 32.1% |
| अनेकदा | 5.9.% | अनेकदा | 8.5% |
| कधीच नाही | 42.8% | कधीच नाही | 32.2% |

**18 ते 25 वयोगटातील :** पुरुषांकडून नकोसा स्पर्श आजवर कितीदा अनुभवला, याचे उत्तर 18 ते 25 वर्षांच्या विद्यार्थिनी देत असताना 42.8 टक्के मुली असा स्पर्श अनुभवला नाही असे सांगतात तर 29.3 टक्के विद्यार्थिनींनी असा अनुभव एकदा घेतला आहे. 22 टक्के मुलींनी दोन ते पाच वेळा असा अनुभव घेतला आहे तर अनेकदा असा अनुभव घेणाऱ्या मुलींचे संख्या 5.9 टक्के आहे. याचा अर्थ 25 वर्षाच्या आत असणाऱ्या 57.2 टक्के मुली अशा अनुभवाला सामोरे गेल्या आहेत.

**25 वर्षापुढे :** आज रोजी 25 वर्षावरील वयोगट असलेल्या 32.2 टक्के महिलांनी असा अनुभव घेतला नाही असे सांगितले असले तरी 32.1 टक्के महिलांनी 2 ते 5 वेळा असा अनुभव घेतला आहे. 27.2 टक्के महिलांनी आयुष्यात किमान एकदा नकोसा स्पर्श अनुभवला आहे तर तब्बल 8.5 टक्के महिलांनी अनेकदा असा नकोसा स्पर्श अनुभवला आहे. याचाच अर्थ 67.8 टक्के महिलांनी पुरुषाकडून नकोसा स्पर्श अनुभवला आहे.

**तुलनात्मक अध्ययन :** यावरून असे लक्षात येते की नकोसा स्पर्शाचा अनुभव हा वाढत्या वयातल्या महिलांना अनेकदा आला आहे. याबाबत तुलना करता असे लक्षात आले की, आज केवळ वयाची 25 वर्षापर्यंतच्या 57.2 टक्के विद्यार्थिनीना अशा अनुभवांना सामोरे जावे लागले आहे ही चिंतेची बाब आहे.

**निष्कर्ष :** ज्येष्ठ वयोगटातील महिला ज्यांची संख्या 67.8 टक्के आहे अशांनी नकोसा स्पर्श अनुभवला आहे. या महिलांनी 2 ते 5 वेळा असा स्पर्श अनुभवला आहे.

18 ते 25 वयोगटात 42.8 टक्के तर 25 वर्षावरील गटात 32.2 टक्के महिला याप्रकारचा अनुभव नाही असे म्हणतात. पण, सर्वेक्षणातील अन्य प्रश्ना तील उत्तरांचा तौलनिक अभ्यास करता हे प्रमाण परस्पर विरोधी आढळते. मग मुली आणि महिला सत्य लपवितात का असे दोषारोपण करताना काही शक्यता लक्षात घ्यायला हव्यात. मुली आणि महिला त्यांना आलेल्या अनुभवांबद्दल मोकळेपणाने बोलू शकत नसाव्या. कदाचित त्यांच्याही नकळत असे नकोसे अनुभव त्यांनी मनाच्या कप्प्यात खोलवर कुठेतरी दाबून ठेवले असले पाहिजे की ते जणू काही विस्मृतीतच गेले आहेत. परंतु, अनुभव विसरल्या तरी अनुभवामुळे उत्पन्न झालेली प्रतिक्रियात्मक भावना त्या विसरल्या नाही. त्याची त्यांनी बरोबर नोंद केली. घटना विसरली असली तरीही त्याचा मनावर झालेला परिणाम मात्र त्या अजूनही भोगत आहेत का हा एक स्वतंत्र संशोधनाचा विषय आहे.

Change

**प्रश्न क्र. 11 :- तुम्हाला नकोसा स्पर्श (बॅड टच) करणाऱ्या व्यक्तींचा हेतू काय असावा?**

| **वयवर्ष 18 ते 25** | | **वयवर्ष 25 च्यापुढे** | |
|---|---|---|---|
| स्पर्शसुख | 17.4% | स्पर्शसुख | 24.9% |
| विकृत आनंद | 14.5% | विकृत आनंद | 35.1% |
| स्त्री देहाबद्दल उत्सुकता | 16.2% | स्त्री देहाबद्दल उत्सुकता | 15.1% |
| अपमान | 8.6% | अपमान | 1% |
| बदला घेणे | 2.9% | बदला घेणे | 0% |
| प्रेम | 2.6% | प्रेम | 0.7% |
| लैंगिक सुख | 14.8% | लैंगिक सुख | 14.4% |
| अनुभव नाही | 26.6% | अनुभव नाही | 30.2% |
| माहित नाही | 35.9% | माहित नाही | 18.7% |

**वयवर्षे 18 ते 25 :** नकोसा स्पर्श करणाऱ्या व्यक्तींचा हेतू काय असावा या प्रश्नाचे उत्तर देताना 18 ते 25 वयोगटातल्या 26.6 टक्के विद्यार्थिनींना हा अनुभव नाही तर 35.9 टक्के विद्यार्थिनींना अशा नकोशा स्पर्शाचे कारण माहिती नाही. 14.8 टक्के विद्यार्थिनींना लैंगिक स्पर्श सुखासाठी हा प्रयत्न असावा असे वाटते. याशिवाय स्त्री देहाबद्दल उत्सुकता 16.2 टक्के तर त्यांचा अपमान करणे या कारणासाठी स्पर्श झाला असावा असे 8.6 टक्के विद्यार्थिनींना वाटते. 2.9 टक्के विद्यार्थिनी अशी कृती ही बदला घेणे तर 2.6 टक्के मुलींना प्रेमातून अशी कृती केली असेल असे वाटते.

**25 वर्षांपुढे :** 25 वर्षांवरील वयोगटाचा विचार करता 30.2 टक्के महिलांना हा अनुभव नाही तर 18.7 टक्के महिलांना अशा कृतीचे कारण माहिती नाही. 35 टक्के महिलांना हा विकृत सुख मिळवण्याचा प्रयास असावा असे वाटते. त्या खालोखाल

स्पर्शसुख 24.9 टक्के, उत्सुकता 15.1 टक्के, लैंगिक सुख 14.4 टक्के, अपमान 1 टक्के, प्रेम 0.7 टक्के अशी कारणे वाटतात.

**तुलनात्मक अध्ययन :** या अभ्यासात असे आढळले की दोन विविध पिढ्यांमध्ये व्यक्तींच्या हेतू बाबत मतांतरे आढळतात. नवी पिढी अधिक खुलेपणाने याकडे बघते. प्रेम, स्त्री देहाबद्दल उत्सुकता, लैंगिक सुख या बाबी नवी पिढी अधिक मोकळेपणाने व्यक्त करते. जुन्या पिढीत पुरुषाचा उद्देश हा विकृत आनंद हा अधिक असल्याचे सांगण्यात आले तर विद्यार्थिनी सर्वाधिक कारण हे स्पर्शसुख असावे असे म्हणतात.

**निष्कर्ष :** अपमान, बदला घेणे यातून झालेला नकोसा स्पर्श नव्या पिढीत अनुक्रमे 8 व 3 टक्के वाढल्याचे लक्षात आले. 35.9 टक्के विद्यार्थिनींना अशा नकोशा स्पर्शाचे कारण माहिती नाही ही चिंताजनक बाब सर्वेक्षणात आढळली. आपणास स्पर्श करणाऱ्या व्यक्तीचा हेतू विद्यार्थिनींना ओळखायला यायला हवे असे याकरिता जागरूकता निर्माण करण्याची गरज या निमित्ताने अधोरेखित झाली.

**प्रश्न क्र. 12:- आपण खालील पैकी कोणत्या अत्याचाराचा सामना केला आहे?**

| **वयवर्ष 18 ते 25** | | **वयवर्ष 25च्या पुढे** | |
|---|---|---|---|
| नकोसा स्पर्श | 47.% | नकोसा स्पर्श | 57% |
| बलात्कार | 2.7% | बलात्कार | 0.3% |
| विकृत बोलणे | 22% | विकृत बोलणे | 20.7% |
| अश्लील हावभाव | 15.1% | अश्लील हावभाव | 18% |
| अश्लील चित्रफित पाठवणे | 5.3% | अश्लील चित्रफित पाठवणे | 3.9% |
| लज्जा वाटेल असे मेसेज पाठवणे | 12.2% | लज्जा वाटेल असे मेसेज पाठवणे | 3.3% |
| पाठलाग करणे | 14.5% | पाठलाग करणे | 17.7% |
| अनुभव नाही | 33.6% | अनुभव नाही | 27.9% |

**वयवर्षे 18 ते 25 -** 18 ते 25 वयोगटातील 33.6 टक्के विद्यार्थिनींनी कुठलाही अत्याचार सोसला नसला असे म्हटले असले तरी 66.4 टक्के विद्यार्थिनींनी कुठल्या ना कुठल्या प्रकारे अत्याचाराचा सामना केला आहे. यातही सर्वाधिक अत्याचार हा नकोसा स्पर्श या प्रकारातून झाला आहे व त्याची टक्केवारी 47 टक्के आहे. त्या खालोखाल 22 टक्के विकृत बोलणे, अश्लील हावभाव 15.1 टक्के, पाठलाग करणे 14.5 टक्के, लज्जा वाटेल असे मेसेज पाठवणे 12.2 टक्के अशी आकडेवारी आहे.

**25 वर्षांपुढे :** केवळ 27.9 टक्के महिलांनी अत्याचाराचा अनुभव नाही असे म्हटले याचाच अर्थ 72.1 टक्के महिलांनी कुठल्या ना कुठल्या अत्याचाराचा अनुभव घेतला आहे. यात सर्वाधिक अत्याचार नकोसा स्पर्श 57 टक्के माध्यमाने झाला असून विकृत

बोलणे 20.7 टक्के, अश्लील हावभाव 18 टक्के, पाठलाग करणे 17.7 टक्के अशाप्रकारेही महिलांना अत्याचाराला सामोरे जावे लागले आहे

**तुलनात्मक अध्ययन** : 18 ते 25 वयोगटातील 33.6 टक्के विद्यार्थिनी व 25 वर्षावरील 27.9 टक्के महिलांनी कोणताही अत्याचाराचा अनुभव नसल्याचे सांगितले. त्याच वेळी 25 वर्षांवरील 57 टक्के महिला व 47.3 टक्के विद्यार्थिनींनी नकोसा स्पर्श अनुभवल्याचे सांगितले. विकृत बोलणे हे 20.7 टक्के महिलांनी अनुभवले असून 22 टक्के मुलींनी याचा अनुभव घेतला आहे. अश्लील हावभाव याचा अनुभव 15 टक्के मुलींनी तर 18 टक्के महिलांनी अनुभवला आहे. अश्लील चित्र व मेसेज पाठवणे याचा अनुभव ज्येष्ठ वयोगटाच्या 7.2 टक्के महिला तर 17.5 टक्के मुलींनी घेतला आहे. या अभ्यासात 25 वर्षांवरील केवळ 0.3 टक्के महिलांनी बलात्काराचा अनुभव घेतला असून 18 ते 25 वयोगटातील 2.7 टक्के मुलींनी बलात्काराचा अनुभव घेतले असल्याचे सर्वेक्षणात लक्षात आले आहे.

**निष्कर्ष :** विद्यार्थिनी व महिलांच्या आलेल्या उत्तरात पिढीनुसार काही बदल प्रामुख्याने जाणविले. त्यात बलात्काराचे प्रमाण दुपटीने वाढले आहे. सोशल मिडियाच्या प्रादुर्भावाने अश्लील मेसेज पाठविणे, चित्रफीत दाखविणे हे प्रमाण वाढले आहे. त्याच बरोबर पूर्वी ज्या प्रमाणात पाठलाग होणे, अश्लील हावभाव आदी बाबी नव्या पिढीत किंचित घटल्या असून नव्या माध्यमाने अत्याचार होत आहेत. अतिशय गंभीर अशी आकडेवारी या प्रश्नातून पुढे येत आहे. केवळ वयाच्या 25 व्या वर्षांपर्यंतच मुलींनी विविध प्रकारचे अत्याचार अनुभवले आहेत. बालस्नेही (चाइल्ड फ्रेंडली) असलेल्या 21 व्या शतकात 18 ते 25 वयोगटातील तरुणींनी हे अनुभवलेले अत्याचाराचे प्रमाण चिंता वाटण्याजोगे आहे.

**प्रश्न क्र. 13 :- तुम्हाला कुठे सुरक्षित वाटत नाही?**

| **वयवर्ष 18 ते25** | | **वयवर्ष 25 च्यापुढे** | |
|---|---|---|---|
| स्वतःच्या घरी | 4.3% | स्वतःच्या घरी | 2.6% |
| परिचीत/शेजारी/नातेवाईक | 10.6% | परिचीत/ शेजारी/ नातेवाईक | 4.6% |
| कॉलेज | 3.3% | कॉलेज | 1.3% |
| कामाचे ठिकाण | 5.3% | कामाचे ठिकाण | 5.2% |
| रस्त्याने एकटे जाताना | 68.1% | रस्त्याने एकटे जाताना | 49.2% |
| गर्दीत | 35.5% | गर्दीत | 35.7% |
| स्वतःला सुरक्षित समजतो | 13.2% | स्वतःला सुरक्षित समजतो | 25.2% |

**18 ते 25 वर्षे :** 13.2 टक्के मुली स्वतःला सुरक्षित समजतात याचाच अर्थ 86.8 टक्के मुली स्वतःला असुरक्षित समजतात. गर्दीत रस्त्याने एकटे जाताना कामाच्या ठिकाणी, कॉलेजमध्ये परिचित-नातेवाईकांकडे, एवढेच नव्हे तर स्वतःच्या घरी सुद्धा त्यांना असुरक्षित वाटते असे त्यांनी नमूद केले आहे. रस्त्याने एकटे जाताना मुलींना सर्वात जास्त 68.1 टक्के असुरक्षित वाटते. आपल्या सार्वजनिक स्थळ तरुणींकरिता सुरक्षित नाही, हेच या सर्व्हेद्वारे पुन्हा एकदा सिद्ध झाल्याचे दिसते.

**25 वर्षांपुढे :** 25.2 टक्के महिला स्वतःला सुरक्षित समजतात म्हणजेच 74.8 टक्के महिला स्वतःला सुरक्षित समजत नाहीत. लहान वयातील मुलींमध्ये असुरक्षिततेची भावना असते कारण त्या जास्त वंचित (vulnerable) असतात, हे समजण्यासारखे आहे. जसजश्या मुली वयाने मोठ्या होतात तसतश्या त्या सक्षम होतात. या अर्थाने 26 वर्षांच्या पुढील वयोगटातील जास्तीतजास्त महिलांनी स्वतःला सुरक्षित समजण्यास हरकत नव्हती. याचा एक अर्थ असाही होतो की, वय वाढले तरी महिला स्वतःला सक्षम

समजत नाहीत किंवा त्या खरच सक्षम नाहीत. बहुसंख्य महिला अजूनही स्वतःला टीनेजर मुलींइतक्याच असुरक्षित समजतात.

**तुलनात्मक अध्ययन :** सर्वात जास्त असुरक्षित दोन्ही पिढीला रस्त्याने एकटे जाताना वाटते. त्यानंतर गर्दीत असुरक्षित वाटते. जुन्या पिढीच्या तुलनेत नव्या पिढीला स्वतःच्या घरी, परिचित, शेजारी, नातेवाईक व कॉलेजमध्ये असुरक्षित अधिक वाटू लागले आहे. हा पिढीचा फरक असू शकतो. छोटी कुटुंब, नोकरी करणारे आई वडील अशी कारणे असू शकतात. भीती व असुरक्षिततेच्या छत्रछायेत वाढणाऱ्या मुलींना आज बिनधास्त करण्याची गरज वाटते.

कामाच्या ठिकाणी व गर्दीत दोन्ही पिढी समान पातळीवर स्वतःला असुरक्षित समजतात. याचा अर्थ जग बदलले तरी समाजाच्या मानसिकतेत फारसा फरक नाही. स्वतःला सुरक्षित समजतो असे 25.2 टक्के म्हणणारी जुनी पिढी असली तर आजची पिढी 13.2 टक्केच हे मत नोंदवते आहे, याचा अर्थ स्वतःला सुरक्षित समजण्याची प्रमाण 50 टक्क्याने घटले आहे.

**निष्कर्ष :** 13.2 टक्के मुलींना सुरक्षित वाटते म्हणजेच 86.8 टक्के मुलींना असुरक्षित वाटते हे चिंताजनक आहे. मोठ्या वयोगटात म्हणजे 25 वयोगटावर प्रौढ असणाऱ्या 74.8 टक्के महिलांना वयाच्या या वळणावरही असुरक्षित वाटते, ही समाजाने लक्षात घेण्याजोगी गंभीर बाब आहे.

रस्त्याने एकटे जाताना असुरक्षित वाटण्याच्या प्रमाणात 17 ते 18 टक्केने वाढ झालेली आहे. गर्दीतही असुरक्षित भावना आहे. पिढी बदलली तरी आश्चर्य वाटण्याजोगे म्हणजे नव्या पिढीत 35.5 टक्के तर जुन्या पिढीत 35.7 टक्के आहे.

**प्रश्न क्र. 14 :- तुमची छेडखानी झाली/ कुणी नकोसा स्पर्श किंवा शोषण केले तर तुम्ही तुमच्या भावना कुणाला मोकळेपणाने सांगू शकता?**

| **वयवर्ष 18 ते 25** | | **वयवर्ष 25च्यापुढे** | |
|---|---|---|---|
| आई | 62.9% | आई | 36.7% |
| वडील | 22% | वडील | 7.2% |
| पोलीस | 16.1% | पोलीस | 8.9% |
| भाऊ | 15.8% | भाऊ | 8.2% |
| शेजारी | 2.3% | शेजारी | 1.3% |
| बहिण | 41.5% | बहिण | 27.9% |
| मित्र-मैत्रीण | 15.2% | मित्र-मैत्रीण | 42% |
| शिक्षक | 11.1% | नातेवाईक | 8.2% |
| नातेवाईक | 5.2% | कुणालाच नाही | 10.5% |
| कुणालाच नाही | 14.8% | | |

**वय वर्षे 18 ते 25 :** तुमची छेडखानी झाली, कुणी नकोसा स्पर्श किंवा शोषण केले तर तुम्ही तुमच्या भावना कुणाला मोकळेपणाने सांगू शकता या प्रश्नाला उत्तर देताना 18 ते 25 वयोगटातील 62.9 टक्के मुलींनी आई हे सर्वात विश्वासाचे स्थान असल्याचे सांगितले. त्याखालोखाल 41.5 टक्के मुली बहिणीला मनातले सांगण्याची मुभा असल्याचे म्हणतात. वडील 22 टक्के, भाऊ 15.8 टक्के, मैत्रीण 15.2 टक्के, शिक्षक 11.1 टक्के, नातवाईक 5.2 टक्के यांना विश्वासाने सांगत असल्याचे स्पष्ट होते. परंतु, 14.8 टक्के मुलींनी कुणालाच मनातील काहीच सांगता येत नसल्याचे मत व्यक्त केले.

**25 वर्षांपुढे :** जुन्या पिढीत म्हणजे 25 वर्षांपेक्षा जास्त वयाच्या असलेल्या महिलांनी आजवर आपले मन सर्वाधिक मैत्रिणींकडे मोकळे केले आहे. ही आकडेवारी 42 टक्के आहे. त्याखालोखाल 36.7 टक्के महिलांनी नकोसा स्पर्श, शोषण, छेडखानी याबाबतचा अनुभव आपल्या आईला सांगितला आहे. त्यापाठोपाठ 27.9 टक्के बहिणींकडे मन मोकळे करण्याची मुभा मिळाल्याचे सांगितले या पिढीतील 10.5 टक्के महिलांना कुठेही मन मोकळे करण्याचे स्थान नाही हे अत्यंत दुर्दैवी असल्याचे जाणवते. वडील, पोलिस, भाऊ, शेजारी, नातेवाईक या साऱ्यांना मनातले सांगण्याचा पसंतीक्रम हा 10 टक्के पेक्षा कमी असल्याचे जुन्या पिढीचे वास्तव आहे.

**तुलनात्मक अध्ययन :** पूर्वीच्या तुलनेत पोलिसांना कळविण्याचे प्रमाण दुप्पट झाले आहे. याचा अर्थ कायदा-सुव्यवस्था याबाबत विश्वास वाढला आहे असे म्हणता येऊ शकेल. शिक्षक, नातेवाईक, मैत्रीण यांना मोठ्या प्रमाणात समस्या सांगितल्या जायच्या, ते प्रमाण घटले आहे. एवढे असले तरी अन्याय-अत्याचाराबाबत कुणालाही न सांगण्याची संख्या पूर्वीच्या तुलनेत वाढली आहे. पूर्वी हे प्रमाण 10.5 टक्के होते तर आता ते 14.8 टक्के झाले आहे. खरेतर बदलत्या आणि खुल्या विचारधारेला अनुसरणारे जग असताना नव्या पिढीतल्या मुलींना व्यक्त होण्यास जागा नाही याबाबत खेद वाटावा, अशी परिस्थिती आहे.

**निष्कर्ष :** मन मोकळे करण्यास महिलांना हक्काची जागा आहे का? हे या प्रश्नातून समजून घ्यायचे होते. त्यानुसार आजही समाजातील 14.8 टक्के तरुणी तर 10.5 टक्के महिला आपले मन कुणाजवळही मोकळे करू शकत नाही. 62.9 टक्के तरुणाई ही आपल्या आईजवळ मन मोकळे करू शकते ही आनंदाची बाब आहे. पूर्वीच्या काळाच्या तुलनेत हे प्रमाण जवळजवळ दुपटीने वाढले आहे. याचाच अर्थ आधुनिक काळातील सुशिक्षित माता तरुणींच्या विश्वासाचे स्थान बनले आहे.

त्याचप्रमाणे एक मोठी तफावत या सर्वेक्षणात आढळून आढळून आली ती म्हणजे 42 टक्के महिला आपल्या मनातील भावना मैत्रिणी पुढे मोकळ्या करू शकतात. परंतु, नव्या पिढीतील केवळ 15.2 टक्के तरुणी आपले मन मैत्रिणी पुढे मोकळे करतात. यामागे त्यांच्या वयोगटाचा आणि भावविश्वाच्या मर्यादेचा भाग असू शकतो. परंतु, दोन्ही

गटात मोकळेपणाने व्यक्त होता येईल असे ठिकाण हे बहिणीचे आढळले आहे. कायदा आणि सुव्यवस्था पारदर्शक व बळीतांना सहज उपलब्ध असणारी असल्याचे म्हटले जात असले तरीदेखील आजही 83.9 टक्के तरुण पिढी आणि 91.1 टक्के प्रौढ महिला आजही पोलिसात तक्रार नोंदवायला धजावत नाहीत.

**प्रश्न क्र. 15 :- असुरक्षित वाटल्यामुळे तुम्हाला कधी एखाद्या ठिकाणी जाणे बंद करावेसे वाटले का**?

| **वयवर्ष 18 ते 25** | | **वयवर्ष 25च्या पुढे** | |
|---|---|---|---|
| शाळेत जाणे बंद केले | 1.7% | शाळेत जाणे बंद केले | 0.7% |
| क्लासला जाणे बंद केले | 2.3% | क्लासला जाणे बंद केले | 2% |
| विशिष्ट घरी | 14.4% | विशिष्ट घरी | 14.8% |
| बंद करावेसे वाटले पण बंद करू शकले नाही. | 18.4% | बंद करावेसे वाटले पण बंद करू शकले नाही. | 16.7% |
| जाणे बंद करावेसे वाटले नाही | 72.4% | जाणे बंद करावेसे वाटले नाही | 70.5% |

**18 ते 25 वर्षे :** असुरक्षित वाटल्यामुळे व्यक्ती स्वातंत्र्यावर घाला येऊन कुठे जाणे बंद करावे लागले का या प्रश्ना चे उत्तर 18 ते 25 वयोगटातील मुलींनी देताना जाणे बंद करावेसे वाटले. पण, करू शकलो नाही असे 18.4 टक्के मुलींनी सांगितले. परंतु, 72.4 टक्के मुलींना कुठेही व्यक्ती स्वातंत्र्यावर घाला येऊन जाणे बंद करावेसे वाटले नाही. आजच्या काळातही असुरक्षित वाटणाऱ्या विशिष्ट घरी 14.4 टक्के मुलींनी जाणे बंद केले आहे तर 1.7 टक्के मुलींना शाळेत जाणे सोडून द्यावे लागले तर 2.3 टक्के मुलींना शिकवणी वर्गापासून मुकावे लागले.

**25 वर्षां पुढील :** प्रौढ झालेल्या वयोगटात 70.5 टक्के महिलांना असुरक्षित वाटल्यामुळे एखाद्या ठिकाणी जाणे बंद करावेसे वाटले नाही तर 16.7 टक्के महिलांना एखाद्या ठिकाणी जाणे बंद करावेसे वाटले. पण, त्या करू शकल्या नाही. मात्र, असुरक्षिततेच्या कारणाने 14.8 टक्के महिलांना विशिष्ट घरी जाणे बंद करावे लागले. या खालोखाल 0.7 टक्के महिलांना शाळेत जाणे तर 2 टक्के महिलांना शिकविणीला जाणे असुरक्षिततेमुळे शक्य झाले नाही.

**तुलनात्मक अध्ययन :** जुन्या पिढीच्या तुलनेत नव्या पिढीत एखाद्या ठिकाणी असुरक्षितेच्या कारणाने न जाण्याचे प्रमाण वाढले आहे. बंद करावेसे वाटले पण करू शकले नाही या बाबीत नव्या पिढीत वाढ झाली आहे हे आश्चर्यकारक आहे. कारण नव्या पिढीला स्वातंत्र्य अधिक प्रमाणात मिळते असे आपण म्हणतो मग तरीही ते आपले मत मांडू शकत नाही का? याबाबत संभ्रम निर्माण होतो. याउलट जाणे बंद करावेसे वाटले नाही असे नोंदवणाऱ्यांचे प्रमाण 2 टक्के वाढल्याचे जाणवते.

**निष्कर्ष :** जुन्या पिढीच्या तुलनेत असुरक्षिततेच्या कारणाने कुठे जाणे बंद करावेसे वाटणे हे प्रमाण घटले आहे. तसेच एखाद्या ठिकाणी जाऊ नये असे वाटले पण तेथे जाणे टाळता येत नाही हे प्रमाण सुद्धा नव्या काळात वाढले आहे. कदाचित असुरक्षित वाटण्याच्या ठिकाणी नाईलाजाने मुलींना जावे लागत आहे. ज्येष्ठ पिढीच्या तुलनेत असुरक्षित वाटणाऱ्या ठिकाणी म्हणजेच शाळा व शिकवणी वर्गात न जाण्याचे प्रमाण वाढले असून त्यात शाळेत जाणे बंद करावे लागले अशी आकडेवारी 0.7 टक्क्यांवरून 1.7 टक्के वर आली आहे. शिकवणीला 2 टक्के ज्येष्ठ महिलांनी जाणे टाळले असल्याचे नमूद केले असले तरी नव्या पिढीत हे प्रमाण 2.3 टक्के आहे.

**प्रश्न क्र. 16 :- तुम्ही अनुभवलेल्या अत्याचार/ शोषण वा छेडखानीचा परिणाम तुमच्या आयुष्यावर झाला का?**

**वयवर्षे 25च्या पुढे.**

| **आयुष्यावर परिणाम** | **टक्केवारी** |
|---|---|
| होय | 25.5% |
| नाही | 45.3% |
| अनुभव नाही | 29.2% |

(**टीप :** हा अनुभव विद्‌यार्थी गटात घेतला नाही. कारण, कदाचित जीवनावर परिणाम झाला अथवा नाही असे ते इतक्या लहान वयात सांगू शकणार नाहीत.)

मोठ्या गटाने अशा अनुभवांचा जीवनावर परिणाम न झाल्याचे म्हटले आहे ही टक्केवारी 45.3 टक्के आहे. 29.2 टक्के महिलांनी याबाबत अनुभव नसल्याचे सांगितले आहे तर 25.5 टक्के महिलांच्या आयुष्यात परिणाम झाला असल्याचे सांगितले. म्हणजे आलेल्या अनुभवांचे दमन, विसर्जन केल्या गेले का? व्यापकदृष्ट्या असा परिणाम झाला नसणे हे योग्यच आहे. कारण, वाईट अनुभवानंतर दोषी वाटून घेण्याचे कारण नाहीच. परंतु, त्या अनुभवांचे वैचारिकरीत्या विघटन न होता दमन झाल्यास पुढील जीवनात अथवा उतरत्या वयात हे ओझे त्रास देऊ शकते.

**निष्कर्ष :** या उलट ज्या 25.5 टक्के महिला अशा अनुभवांचा जीवनावर परिणाम झाला असे म्हणतात त्यांच्यासाठी पिअर ग्रुप तयार करून ही बोच कमी करण्याची गरज आहे. त्यांना आधार देणे, त्या अनुभवातून बाहेर का ढणे, त्याबाबत संवाद साधणे याबाबी पण महत्त्वाच्या आहेत असे जाणविले.

**प्रश्न क्र. 17 :- आजही आपण समाजात मुलींना अत्याचार/ शोषण यांचा सामना करताना पाहता का?**

| **अत्याचाराचा सामना करताना पाहता का?** | **टक्केवारी** |
|---|---|
| होय | 79.7% |
| नाही | 20.3% |

25 वर्षांपुढील वयोगटासाठीच हा प्रश्न विचारला होता. 20 टक्के महिलांनी असे अत्याचार होताना दिसत नाहीत असे म्हटले असले तरी 79.7 टक्के महिला असे अत्याचार होत असताना पाहत आहे, त्यांना ते जाणवत सुद्धा आहे. आजही शोषण होणाऱ्यांचे प्रमाण फार मोठे आहे. त्यादृष्टीने ही आकडेवारी लक्षणीय आहे. ज्या महिलांनी स्वतः असे अनुभव घेतले असतील ते या घटना अधिक डोळसपणे बघत असतात असे जाणवते.

साधारण 80 टक्के महिला मुलींना अत्याचार-शोषणाचा सामना करावा लागतो हे मान्य करतात हा समाजातून आलेला आवाज आहे. ज्याच्याद्वारे खरे तर सामाजिक बदल घडू शकतो. परंतु, यासाठी हा आवाज एकजुटीने व्यक्त झाला पाहिजे, एकत्र आला पाहिजे.

Change

**प्रश्न क्र. 18 :- जेव्हा आपण अन्य मुलींना अत्याचार/ शोषण वा छेडखानीचा सामना करताना बघता तेव्हा काय भूमिका घेता?**

**वयवर्षे 25च्यापुढे.**

| **भूमिका काय** | **टक्केवारी** |
|---|---|
| मुलीला धीर देणे | 65.9% |
| तिच्या आईवडिलांना सांगणे | 28.9% |
| त्रास देणाऱ्या पुरुषास धाक देणे | 38.7% |
| पोलिसांना कळविणे | 27.5% |
| काहीही करत नाही | 7.9% |

जेव्हा अन्य मुलींना अत्याचार/ शोषण वा छेडखानीचा सामना करताना बघता तेव्हा का य भूमिका घेता हा प्रश्न महिलांना विचारला असता 65.9 टक्के महिला मुलीला धीर देतात. त्या खालोखाल 38.7 टक्के महिला त्रास देणाऱ्या पुरुषांना धाक देतात. 28.9 टक्के महिला मुलीच्या पालकांना याबाबत माहिती देतात तर 27.5 टक्के महिला पोलिसांना याबाबत कळवितात असे म्हटले आहे. याउलट अन्य मुली शोषण-अत्याचाराचा सामना करत असताना 7.9 टक्के महिला कुठलीही भूमिका घेत नाहीत.

**निष्कर्ष :** 65.9 टक्के महिला मुलींना धीर देतात. 7.9 टक्के महिला काहीच करत नाही. पुरुषांना समज देणे 38.7 टक्के किंवा पोलिसांना कळवणे 27.5 टक्के हे पाऊल खूप कमी महिला उचलतात. जेव्हा की पोक्सो कायद्यानुसार अल्पवयीन मुलीने कोणालाही विश्वासात घेऊन अत्याचाराबद्दल माहिती दिल्यास, त्या व्यक्तीला पोलिसांना कळवणे बंधनकारक आहे. पण, या कायद्याबद्दल महिलांना माहिती आहे का या प्रश्नाचे उत्तर नकारात्मक येऊ शकतं.

या प्रश्नाचे विश्लेषण करताना मुलीला धीर देणे हे 65.9 टक्के सर्वाधिक प्रमाणात केले जाते. पण, त्यामानाने कृतीशील पावले कमी प्रमाणात प्रमाणात उचलली जातात.

त्रास देणाऱ्या पुरुषास धाक देणे, आईवडिलांना सांगणे व पोलिसांना कळविणे हे केले जाते. याबाबी न करणारे सुद्‌धा 7.9 टक्के महिला आहेत. ज्या संकटग्रस्त मुलींना पाहत तर असतील पण त्याविरोधात कोणतीही पावले उचलत नाहीत.

**प्रश्न क्र. 19 :- स्त्रीचे आयुष्यबंधनकारक/ त्रासदायक आहे व आपण पुरुष म्हणून जन्मास यायला हवे होते असे तुम्हाला कधी वाटले का?**

| **वयवर्ष 18 ते 25** | | **वयवर्ष 25च्यापुढे** | |
|---|---|---|---|
| नेहमीच | 8.5% | नेहमीच | 8.2% |
| कधी कधी | 43.8% | कधी कधी | 32.8% |
| कधीच नाही | 47.7% | कधीच नाही | 59% |

**वयवर्षे 18 ते 25 :** स्त्रीचे आयुष्य बंधनकारक/त्रासदायक आहे व आपण पुरुष म्हणून जन्मास यायला हवे होते असे वाटते का या प्रश्नांचे उत्तर 52.3 टक्के तरुणींनी होय असे दिले आहे. 8.5 टक्के असे नेहमीच वाटते तर 43.8 टक्के तरुणींच्या मनात अशी भावना कधी कधी येते.

**25 वर्षांपुढे :** 41 टक्के महिलांच्या मनात स्त्रीचे आयुष्य बंधनकारक असल्याचे विचार आहेत म्हणजेच एकूण 59 टक्के महिला स्वतःचे आयुष्य बंधनकारक मानत नाहीत. 32.8 टक्के महिलांच्या मनात कधी कधी असे विचार येतात तर 8.2 टक्के महिलांना नेहमीच असे वाटते.

**तुलनात्मक अध्ययन :** नव्या पिढीच्या स्त्रीचे आयुष्य बंधनकारक, त्रासदायक आहे व आपण पुरुष म्हणून जन्मास यायला हवे होते असे तुम्हाला कधी वाटले का, या प्रश्नाचे उत्तर दोन्ही पिढीत साधारण सारखे आहे. जुनी पिढी 8.2 टक्के असे मानते तर यात नव्या पिढीत 0.3 टक्क्यांनी वाढच झाली आहे असे विचार मनात कधीच आले नाही असे जुनी पिढी 59 टक्के असे म्हणत असली तरी आजच्या केवळ 47.7 टक्के

पिढीला असे स्त्रीचे आयुष्य हे बंधनकारक वाटत नाही म्हणजे हे प्रमाण घटले आहे, ही बाब चिंताजनक आहे.

**निष्कर्ष :** नोकरी, स्ट्रेस, आव्हाने, गृहिणी म्हणून असणारी बंधने, नव्या-जुन्याचा मेळ घालणे, शारीरिकदृष्ट्या असणाऱ्या मर्यादा, समाजात असलेली स्पर्धा या साऱ्या घटकांचा हा परिणाम असण्याची शक्यता नाकारता येत नाही. वयवर्षे 18 ते 25 वयोगटात स्त्रीचे आयुष्यबंधनकारक/ त्रासदायक आहे व आपण पुरुष म्हणून जन्मास यायला हवे होते असे वाटण्याचे प्रमाण नव्या पिढीत 11 टक्क्यांनी वाढले आहे. याचे कारण शोधू जाता नव्या पिढीच्या मनात प्रचंड वैचारिक संघर्ष असावा असे वाटते.

**प्रश्न क्र. 20 :- आपण सार्वजनिक शौचालय वापरता का?**

| **वयवर्षे 18 ते 25** | | **वयवर्षे 25च्यापुढे** | |
|---|---|---|---|
| होय | 14% | होय | 20.3% |
| नाही | 40.2% | नाही | 25.9 % |
| अडचणीच्या वेळी | 41.2% | अडचणीच्या वेळी | 51.8% |
| वापरायचे आहे पण उपलब्ध नाही | 4.6% | वापरायचे आहे पण उपलब्ध नाही | 2% |

**18 ते 25 वर्षे :** फक्त 14 टक्के मुली सार्वजनिक शौचालयाचा नियमित वापर करतात. याचाच अर्थ 86 टक्के सार्वजनिक शौचालय वापरणे फारसे पसंत करीत नाहीत. त्यापैकी 41.2 टक्के मुलींनी सार्वजनिक शौचालयाचा वापर केवळ अडचणीच्या वेळी नाईलाजाने केला आहे. 4.6 टक्के मुलींना अनेकदा शौचालयांची गरज पडते. परंतु, ते उपलब्ध नसल्याचे त्या सर्वेक्षणात सांगतात. परंतु, समाजातील 40.2 टक्के मुलींनी सार्वजनिक शौचालय कधीच वापरले नाही.

**25 वर्षांपुढे :** 25 वर्षांच्या पुढील 51.8 टक्के महिलांनी सार्वजनिक शौचालयाचा केवळ अडचणीच्या वेळी वापर केला आहे 20.3 टक्के महिलांनी हा वापर नियमित करीत असल्याचे नमूद केले आहे तर 2 टक्के महिलांना सार्वजनिक शौचालय वापरायचे असते. पण, उपलब्ध नाही असे म्हणायचे आहे. 25.9 टक्के महिलांनी मात्र सार्वजनिक शौचालय कधीच वापरले नाही.

**तुलनात्मक अध्ययन :** जुन्या पिढीच्या तुलनेत विचार करता नवी पिढी सार्वजनिक शौचालयाचा वापर कमी प्रमाणात करते. अडचणीच्या वेळीच वापरण्याची संख्या कमी झाली आहे. परंतु, वापरायचे आहे पण उपलब्ध नाही असे म्हणणारा 4.6 टक्के वर्ग नव्या पिढीत आहे जो पूर्वीच्या पिढीत केवळ 2 टक्के आहे.

**निष्कर्ष :** शौचालयाची गरज असताना सार्वजनिक स्वच्छतागृहे उपलब्ध नसणे ही एक मोठी समस्या आहे. नैसर्गिक गरजेच्या वेळी मलमूत्र विसर्जन न केल्यामुळे अनेक रोग उद्‌भवतात. तरुण पिढीला सुद्‌धा या समस्येचे शिकार व्हावे लागते आहे हे अतिशय चिंताजनक आहे.

आज मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढते आहे. जास्तीत जास्त महिलांनी वर्क फोर्समध्ये यावे म्हणजे जीडीपी वाढेल आणि देशाचा विकास होईल असे भारत सरकारचे म्हणणे आहे. परंतु, कामकाजी महिलांना जेव्हा निसर्गाच्या हाकेला ओ देता येत नाही आणि आपल्या शरीरधर्माच्या नैसर्गिक क्रिया स्वच्छतेच्या निकषात पूर्ण करता येत नाही ही बाब महिलांसाठी अत्यंत काळजीची असते. या एवढ्या कारणाकरिता मध्यमवयीन प्रौढावस्थेतील महिलांनी आपल्या उपजीविकेच्या पर्यायांना नाकारले आहे. नैसर्गिक रचनेनुसार महिलांना मलमूत्र विसर्जनासाठी हवा असलेला आडोसा, स्वच्छता, मासिक

पाळीच्या काळात हव्या असलेल्या सुविधा न मिळाल्याने महिलांना 'राईट टू पी' सारखे मोठे आंदोलन उभारावे लागले, त्यास पुरेसे यश अद्यापही किमान भारतात तरी न लाभल्याचे या सर्वेक्षणातून पुढे आल्याचे जाणवते.

**प्रश्न क्र. 21:- कोणत्या कारणाने आपणास सार्वजनिक शौचालय वापरायची इच्छा होत नाही?**

| **वयवर्ष 18 ते 25** | | **वयवर्ष 25च्यापुढे** | |
|---|---|---|---|
| लाज वाटते | 2% | लाज वाटते | 2% |
| स्वच्छता नसते | 74% | स्वच्छता नसते | 71.6% |
| गरज नसते | 9.2 % | गरज नसते | 5.1% |
| वापरायचे असते पण उपलब्ध नसते | 3.6% | वापरायचे असते पण उपलब्ध नसते | 4.6% |
| सुरक्षित वाटत नाही | 11.2% | सुरक्षित वाटत नाही | 13.4% |
| उपयोग करतो तक्रार नाही | 0% | उपयोग करतो तक्रार नाही | 3.3% |

**18 ते 25 वर्षे :** 74 टक्के मुली शौचालयात स्वच्छता नसते म्हणून वापरत नाही अशी तक्रार करतात तर त्या खालोखाल 11.2 टक्के मुली सुरक्षित वाटत नाही अशी तक्रार करतात. सार्वजनिक शौचालय वापरण्यास काहीच तक्रार नाही असे 0 टक्के मुलींना वाटते. म्हणजे सार्वजनिक शौचालय वापरण्यास 100 टक्के मुली तक्रार करतात.

**25 वर्षांपुढे :** 71.6 टक्के महिला स्वच्छता नसल्याने सार्वजनिक शौचालय वापरत नसल्याचे म्हणतात. 13.4 टक्के महिलांना सार्वजनिक शौचालयात सुरक्षित वाटत नाही.

5.1 टक्के महिलांना सार्वजनिक ठिकाणी शौचालय वापरायची गरज वाटत नाही तर केवळ 3.3 टक्के महिलांना सार्वजनिक शौचालयाबाबत कुठलीही तक्रार नाही.

**तुलनात्मक अध्ययन :** सार्वजनिक शौचालय वापरायची इच्छा होत नाही याचे कारण स्वच्छता नसणे हे प्रमाण दोन्ही गटात सर्वाधिक आहे. परंतु, सार्वजनिक शौचालयाचा वापर करताना लाज वाटते हे मत दोन्ही पिढी समप्रमाणात म्हणजे प्रत्येकी 2 टक्के नोंदवते. परंतु, उपयोग करतो, तक्रार नाही हे नव्या पिढीत शून्य टक्के मत नोंदविले आहे. याचाच अर्थ 100 टक्के नव्या पिढीला या व्यवस्थेबाबत तक्रार आहे. जुन्या पिढीत तक्रारीचे प्रमाण 98 टक्क्यांवर होते.

**निष्कर्ष :** सार्वजनिक शौचालय वापरण्यास लाज वाटते. तेथे स्वच्छता नसते, सुरक्षित वाटत नाही. वापरायचे असते पण उपलब्ध नाही अशा अनेक कारणांनी महिला व तरुणी सार्वजनिक शौचालय वापरीत नाहीत असे लक्षात येते. निसर्गाची मलमूत्र विसर्जनाची हाक आली की लगेच त्याला प्रतिसाद द्यावा हे आरोग्यशास्त्र कितीही सांगत सांगते तरीही समाजात सार्वजनिक शौचालयांची मुबलकताव दयनिय स्थिती पाहून नैसर्गिक गरजा दाबून ठेवण्याकडे नागरिकांचा ओढा आहे हे पुन्हा एकदा या प्रश्नातून सिद्ध झाले आहे.

## भाग 2: कायदा व सुव्यवस्था

**प्रश्न क्र. 22 :- कुणी मागे लागल्यास/ अश्लील मेसेजेस पाठवल्यास मुलगी किंवा स्त्री कायद्याचा आधार घेऊ शकते तो कायदा कोणता?**

| वयवर्ष 18 ते 25 | | वयवर्ष 25 च्यापुढे | |
|---|---|---|---|
| 444 | 5.3% | 444 | 3.3% |
| 354 | 22% | 354 | 23.9% |
| 420 | 5.9% | 420 | 4.3 |
| माहित नाही | 66.8% | माहित नाही | 68.5% |

**वयवर्षे 18 ते 25 :** फक्त 22 टक्के मुलींना छेडखानी संदर्भातला 354 हा कायदा माहिती आहे. 66.8 टक्के मुलींना हा कायदा माहिती नाही तर 11.2 टक्के मुलींनी चुकीचे उत्तर दिले.

**25 वर्षांपुढे :** या वयोगटातील फक्त 23.9 टक्के महिलांना छेडखानी संदर्भातील 354 या कायद्याची माहिती आहे. 68.5 टक्के महिलांना हा कायदा माहिती नाही तर 7.6 टक्के महिलांनी या प्रश्नांचे उत्तर चुकीचे दिले.

**तुलनात्मक अध्ययन :** दोन्ही पिढीत कायदा माहीत नसल्याचे प्रमाण साधारण समान आहे. जुन्या पिढीतील 68.5 टक्के तर नव्या पिढीतील 66.8 टक्के महिलांना कुणी मागे लागल्यास/अश्लील मेसेजेस पाठवल्यास मुलगी किवा स्त्री कायद्याचा आधार घेऊ शकते तो कायदा माहीत नाही. याच अनुक्रमाने मोठ्या गटात उत्तर बरोबर देणाऱ्यांचे प्रमाण 23.9 टक्के तर नव्या पिढीत 22 टक्के आहे.

**निष्कर्ष :** 66.8 टक्के मुलींना 354 या कलमाबद्दल माहिती नाही तर 11.2 टक्के मुलींनी चुकीच्या कायद्याचे ऑप्शन निवडले. फक्त 22 टक्के मुलींनी 354 ही कलम माहिती असल्याचे सांगितले. म्हणजेच 78 टक्के मुलींना या कलमाबद्दल काहीच माहिती नाही. 54 हा कलम छेडखानी, मुलींना बॅड टच करणे, अश्लील मेसेज पाठवणे, अश्लील

हावभाव करणे, मुलींचा त्यांच्या परवानगीशिवाय फोटो काढणे याबद्दल आहे. अल्पवयीन आणि तरुण मुलींना या समस्यांचा सामना नेहमीच करावा लागतो. त्यामुळे या कायद्याबद्दलची जागृती करणे अत्यावश्यक आहे. मुलींचे शिक्षण घेण्याचे, नोकरी करण्याचे प्रमाण वाढवायचे असेल तर मुलींना सामाजिक सुरक्षितता प्रदान करणे अत्यंत आवश्यक आहे. ही सुरक्षितता कलम 354 प्रदान करते. या कलमाबद्दलचे अज्ञान या प्रश्नाद्वारे अधोरेखित झाले आहे. त्यामुळे त्याबद्दल जाणीवजागृती करणे अत्यंत आवश्यक आहे.

**प्रश्न क्र. 23:- बलात्कारासाठी खालीलपैकी कोणत्या कलमांतर्गत गुन्हा नोंदवला जातो?**

| **वयवर्ष 18 ते25** | | **वयवर्ष 25च्यापुढे** | |
|---|---|---|---|
| 373 | 7.6% | 373 | 3.9% |
| 375-376 | 26.7% | 375-376 | 31.8% |
| 378 | 6.9% | 378 | 5.6% |
| माहित नाही | 58.8% | माहित नाही | 58.7% |

**18 ते 25 वयोगट :** या वयोगटातील फक्त 26.7 टक्के मुलींना बलात्कारा संदर्भातील 375 कलम माहिती आहे. 58.8 टक्के मुलींना हा कायदा माहिती नाही तर 14.5 टक्के मुलींनी या कलमासंदर्भात चुकीची उत्तरे दिली. बलात्काराचा प्रश्न इतका गंभीर असतानाही त्याबद्दलच्या कलमांची माहिती मुलींना नाही ही चिंताजनक बाब आहे.

**25 वर्षांपुढे :** 25 वर्षां पुढील वयोगटातील फक्त 31.8 टक्के महिलांना या कलमांसंदर्भातली माहिती आहे तर 58.7 टक्के महिलांना या कायद्याबद्दल माहितीच नाही. 9.5 टक्के महिलांनी या प्रश्नांचे उत्तर चुकीचे दिले.

**तुलनात्मक अध्ययन :** बलात्कारासाठी कोणते कलम आहे याची माहिती नव्या व जुन्या पिढीत 58.7 टक्के व 58.8 टक्के महिलांना नाही. दोन्ही वयोगटात महिलांबाबत कायद्याबद्दलचे अज्ञान अधोरेखित होते.

**निष्कर्ष :** निर्भया प्रकरणाला दहा वर्ष होऊन गेली तरी बलात्काराचे सत्र चालूच आहे. कायदे कठोर केले आहेत, कायदे कठोर करण्याची प्रक्रिया चालू आहे. पण, कायदेच माहिती नसेल तर त्याचा उपयोग कसा केला जाणार? कायद्याबद्दलचे अज्ञान ही एक चिंताजनक बाब आहे हे या सर्वेक्षणाद्वारे पुन्हा एकदा समोर आले.

**प्रश्न क्र. 24:- 498-अ हा कलम कशासाठी आहे?**

| वयवर्षे 18 ते 25 | | वयवर्षे 25 च्या पुढे | |
|---|---|---|---|
| विवाहित स्त्रीवर होणारा कौटुंबिक हिंसाचार | 25.7% | विवाहित स्त्रीवर होणारा कौटुंबिक हिंसाचार | 34.8% |
| अविवाहित स्त्रीवर होणारा कौटुंबिक हिंसाचार | 6% | अविवाहित स्त्रीवर होणारा कौटुंबिक हिंसाचार | 2.2 % |
| अल्पवयीन मुलीवर होणारा कौटुंबिक हिंसाचार | 8.8% | अल्पवयीन मुलीवर होणारा कौटुंबिक हिंसाचार | 3% |
| माहित नाही | 59.5% | माहित नाही | 60% |

**वयवर्षे 18 ते 25 :** वय वर्षे 18 ते 25 या वयोगटातील 59.5 टक्के मुलींनी हा कायदा माहिती नसल्याचे सांगितले. फक्त 25.7 टक्के मुलींना या कायद्याबद्दल माहिती आहे तर 14.8 टक्के मुलींनी या कायद्याबद्दल चुकीचे उत्तर दिले.

**25 वर्षांपुढे :** वय वर्ष 25 च्या पुढील वयोगटातील 34.8 टक्के महिलांना 498 कलमाबद्दल माहिती आहे. 60 टक्के महिलांना या कायद्याबद्दल काहीच माहिती नाही तर 5.2 टक्के महिलांनी या कायद्याबद्दल चुकीचे उत्तर दिले.

**तुलनात्मक अध्ययन :** दोन्ही पिढीतील 60 टक्के 498-अ ही कलम कशासाठी आहे हे माहीत नाही. 14.9 टक्के विद्यार्थिनींनी चुकीचे उत्तर दिले असून ज्येष्ठ वयोगटातील केवळ 5.3 टक्के महिलांनी चुकीचे उत्तर दिले आहे.

**निष्कर्ष :** आजच्या विद्यार्थीनी उद्याच्या भावी गृहिणी आहेत. त्यांना विवाहित स्त्रीवर होणारा कौटुंबिक हिंसाचाराबाबत कायदा (कलम) माहीत होणे आवश्यक आहे असे वाटते. 498 अ या कलमाबद्दल नेहमीच ही ओरड केली जाते की त्याचा महिला गैरवापर करतात. गैरवापर करायला हा कलम माहिती हवा, हे लक्षात घेतले तर 60 टक्के मुलींना हा कायदा माहितीच नाही. त्यामुळे या कलमाचा गैरवापर करणाऱ्या महिलांचे प्रमाण हे अत्यल्प आहे हे या अहवालातून निष्पन्न झाले आहे. त्यामुळे कलमांचा मोठ्या प्रमाणात गैरवापर होतो, या आरोपाचे खंडन यातून होऊ शकते.

कौटुंबिक हिंसाचाराचा सामना महिला सतत करत असतात गंभीर स्वरूपाचा कौटुंबिक हिंसाचार लग्नानंतर सुरुवातीचे काही वर्ष जास्त प्रमाणात होतो हे लक्षात घेऊन हा कायदा बनवण्यात आला आहे. पण, जवळपास 60 टक्के महिलांमध्ये या कायद्याबद्दलचे अज्ञान आहे.

Change

**प्रश्न क्र. 25 :- अल्पवयीन मुलींसाठी कोणता कायदा अस्तित्वात आहे?**

| वयवर्ष 18 ते 25 | | वयवर्ष 25 च्यापुढे | |
|---|---|---|---|
| आईटीसी 2000 | 8.2% | आईटीसी 2000 | 3.3% |
| पोक्सो | 27.3% | पोक्सो | 36.4% |
| 376 | 10.5% | 376 | 7.5% |
| माहित नाही | 54% | माहित नाही | 52.8% |

**वयवर्षे 18 ते 25 :** 18 ते 25 या वयोगटातील फक्त 27.3 टक्के मुलींना पोक्सो या कायद्याबद्दल माहिती आहे. 54 टक्के मुलींना पोक्सो या अल्पवयीन मुलींसाठी असलेल्या कायद्याची माहिती नाही तर 18.7 टक्के मुलींनी लहान मुलींसाठी असलेला कायदा म्हणजे आयटीसी 2000 किंवा 376 कलम आहे असे चुकीचे उत्तर दिले.

**25 वर्षांपुढे :** 25 वर्षां पुढील वयोगटात फक्त 36.4 टक्के महिलांना पोक्सो या का यद्याबद्दल माहिती आहे. 52.8 टक्के महिलांना पोक्सो हा कायदा माहितीच नाही तर 10.8 टक्के महिलांनी लहान मुलींसाठी असलेला कायदा म्हणजे आयटीसी 2000 किंवा 376 कलम असे चुकीचे उत्तर दिले.

**तुलनात्मक अध्ययन :** अल्पवयीन मुलींसाठी कोणता कायदा अस्तित्वात आहे या प्रश्ना बाबत विद्यार्थी गटात 54 टक्के तर महिला गटात 52.8 टक्के अज्ञान आहे. 36.4 टक्के महिलांना व 27.3 टक्के विद्यार्थिनींना योग्य उत्तर माहिती आहे. 18.7 टक्के विद्यार्थीनींनी चुकीचे उत्तर दिले असून महिला गटात हे प्रमाण 10.8 टक्के आहे.

**निष्कर्ष :** याचाच अर्थ असा की नव्या पिढीला का यदेविषयक जनजागृतीची नितांत गरज आहे. पोक्सो कायदा फक्त 27.3 टक्के तरुणींना माहिती आहे तर फक्त 36.4 टक्के महिलांना हा कायदा माहिती आहे. बालकांचे शोषण थांबवायचे असेल तर पोक्सो या कायद्याची माहिती सगळ्यांना असणे अत्यंत गरजेचे आहे. पोक्सो या कायद्याबद्दल सुद्धा 46 टक्के मुलींना माहिती नाही. अल्पवयीन (वय वर्ष 18 च्या

आतील) मुलींना सुद्धा याबद्दल माहिती असण्याचे प्रमाण कमी असावे. या कायद्याची नीट माहिती असेल तरच अंमलबजावणी योग्य पद्धतीने होऊ शकेल.

**प्रश्न क्र. 26 :- स्वतःवर अन्याय झाला म्हणून तुम्ही कधी पोलिसात तक्रार नोंदवली आहे का?**

| **वयवर्ष 18 ते 25** | | **वयवर्ष 25 च्यापुढे** | |
|---|---|---|---|
| होय | 6.9% | होय | 3.9% |
| नाही | 87.2% | नाही | 47.2% |
| अन्याय झाला पण तक्रार नोंदवली नाही | 5.9% | अन्याय झाला पण तक्रार नोंदवली नाही | 5.9% |
| अन्याय झाला नाही | 0% | अन्याय झाला नाही | 43% |

**18 ते 25 वयोगट :** अन्याय झाला म्हणून कधी पोलिसात तक्रार नोंदवली आहे का या प्रश्नाचे उत्तर देताना 87.2 टक्के तरुणींनी नाही असे उत्तर दिले. परंतु, स्वतःवर अन्याय झाला नाही हे शून्य टक्के तरुणी उत्तर देतात. याचाच अर्थ असा की 100 टक्के तरुणी कुठल्या ना कुठल्या प्रकारचा अन्याय स्वतःवर झाला असल्याचे मान्य करतात. त्यातील फक्त 93.1 टक्के विद्यार्थिनी पोलिसात कधीही तक्रार नोंदवली नाही तर 6.9 टक्के तरुणींनी अन्यायाविरुद्ध पोलिस स्टेशनात दाद मागितली आहे.

**25 वर्षांपुढे :** 43 टक्के महिला स्वतःवर अन्याय झाला नाही असे म्हणत असल्याने 57 टक्के महिलांवर अन्याय झाल्याचे विश्लेषण करता येते. त्यापैकी केवळ 3.9 टक्के महिलांनी तक्रार नोंदवलेली आहे. 47.2 टक्के महिला कधी पोलिस स्टेशनला तक्रार नोंदविण्यास गेलेल्या नाहीत. 5.9 टक्के महिला स्वतः वर अन्याय झाला असे कबूल करतात पण त्याचबरोबर तक्रार केली नसल्याचेही सांगतात.

**तुलनात्मक अध्ययन :** स्वतःवर अन्याय झाला म्हणून तुम्ही कधी पोलिसात तक्रार नोंदवली आहे का या उत्तरात अनपेक्षितरीत्या तक्रार नोंदविली नाही याचे प्रमाण वाढले आहे. ज्येष्ठ वयोगटात ही आकडेवारी 47.2 टक्के होती तर नव्या पिढीत 87.2 टक्के म्हणजे जवळपास दुपटीने वाढली आहे. अर्थात ह्या आकडेवारीचा विचार करताना विद्यार्थी वर्गाचे वय लक्षात घ्यावयास हवे. परंतु, अजून एक महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थी गटात 6.9 टक्के मुलींनी तक्रार नोंदविली आहे तर महिला गटात हा आकडा निम्मा म्हणजे 3.9 टक्के आहे. अन्याय झाला म्हणून तक्रार नोंदविण्याचे प्रमाण यात वाढलेले दिसते ही सकारात्मक बाब आहे. अन्याय झाला पण तक्रार नाही हे प्रमाण दोन्ही गटात 5.9 टक्के म्हणजे सारखेच आहे.

**निष्कर्ष :** नव्या पिढीत अन्याय झाला नाही असे प्रमाण शून्य आहे. म्हणजेच विद्यार्थिनी स्वतःवर अन्याय झाला आहे असे मानतात. त्यांना अन्यायाची जाणीव आहे व ते त्या स्पष्टपणे मांडतात ही समाधानाची बाब आहे. 43 टक्के महिला स्वतःवर अन्यायच झाला नाही असे म्हणतात. म्हणजे जुन्या पिढीत अन्यायाचे प्रमाण कमी होते असे मानले तरी या महिलांना अन्यायाची जाणीवच नाही असेही म्हणता येईल. तरी या दोन्ही परिषदेत पोलिसात जाऊन तक्रार नोंदवावी न्याय मिळवून द्यावा अशी भावना दोन्ही पिढ्यांमध्ये उपजली नसल्याचे लक्षात येते.

**प्रश्न क्र. 27 :- पोलिस स्टेशनला तक्रार नोंदवायला भीती वाटते का?**

| **वयवर्ष 18 ते 25** | | **वयवर्ष 25 च्यापुढे** | |
|---|---|---|---|
| होय | 30.3% | होय | 32.8% |
| नाही | 69.7% | नाही | 67.2% |

**वयवर्षे 18 ते 25 :** या गटातील 69.7 टक्के मुलींना पोलिस स्टेशनची भीती वाटत नाही तर 30.3 टक्के मुलींना पोलिस स्टेशनला तक्रार करण्यास भीती वाटते.

**25 वर्षांपुढे :** 67.2 टक्के महिलांना पोलिस स्टेशनची भीती वाटत नाही तर उर्वरित 32.8 टक्के महिलांना आजही पोलिस स्टेशनला तक्रार नोंदवण्याची भीती वाटते.

**तुलनात्मक अध्ययन :** पोलिस स्टेशनला तक्रार नोंदवायला भीती वाटते का, याचे उत्तर विद्यार्थी गटात 69.7 टक्के तर महिला गटात 67.2 टक्के नाही असे आहे. पोलिसांची भीती वाटत नाहीचे प्रमाण कमी होत आहे, ही सकारात्मक बाब आहे. पण त्याच बरोबर विद्यार्थी गटात 30.3 टक्के तर महिला गटात 32.8 टक्के वर्गाला आजही पोलिस स्टेशनला तक्रार नोंदवायला भीती वाटते. दोन पिढ्यांचे अंतर पाहता यात म्हणावा तसा फरक आढळत नाही.

**निष्कर्ष :** पोलिसांची भीती वाटत नाहीचे प्रमाण कमी होत आहे ही सकारात्मक बाब आहे. पण, त्याच बरोबर विद्यार्थी गटात 30.3 टक्के तर महिला गटात 32.8 टक्के वर्गाला आजही पोलिस स्टेशनला तक्रार नोंदवायला भीती वाटते. दोन पिढ्यांचे अंतर पाहता यात म्हणावा तसा फरक आढळत नाही.

**प्रश्न क्र. 28 :- तुम्ही मिरची स्प्रे वापरला आहे का?**

| **वयवर्ष 18 ते 25** | | **वयवर्ष 25 च्यापुढे** | |
|---|---|---|---|
| होय | 6% | होय | 2.3% |
| नाही | 87.5% | नाही | 91.5% |
| नावच पहिल्यांदा ऐकले | 6.5% | नावच पहिल्यांदा ऐकले | 6.2% |

**वयवर्षे 18 ते 25 :** आजवर कधीही 'मिरची स्प्रे' न वापरणाऱ्या मुलींचे प्रमाण 87.5 टक्के आहे तर 6 टक्के मुलींनी याआधी तो वापरला आहे. तर 6.5 टक्के मुलींनी मिरची स्प्रे चे नावच पहिल्यांदा ऐकले आहे.

**25 वर्षापुढे** : 6.2 टक्के महिलांनी 'मिरची स्प्रे' हे नाव सर्वेक्षणापर्यंत ऐकलेले नव्हते. 91.5 टक्के महिलांनी मिरची स्प्रे कधीही वापरलेला नाही तर केवळ 2.3 टक्के महिलांनी मिरची स्प्रेचा वापर केलेला आहे.

**तुलनात्मक अध्ययन :** महिलांना अत्यंत उपयोगी अशा मिरची स्प्रेचा वापर नव्या पिढीत वाढलेला दिसतो. जुन्या पिढीने केवळ 2.3 टक्के तर विद्यार्थी गटाने त्याच्या दुपटीने म्हणजे 6 टक्के याचा वापर केला आहे. दोन्ही पिढीत जवळपास समानतेने मिरची स्प्रे बद्दल अज्ञान आहे.

**निष्कर्ष :** 94 टक्के मुली व 97.7 टक्के महिला मिरची स्प्रेचा वापर करीत नाहीत असे या सर्वेक्षणात आढळून आले आहे ही, गंभीर बाब आहे. मुलींना स्वसंरक्षणाचे धडे देण्याबद्दल आपण बोलतो. पण, एखाद्या पुरुषांवर दोन-तीन जणांनी हल्ला केला तर तो स्वतःचे संरक्षण करू शकत नाही. जर मुलींवर दोन-तीन जणांनी हल्ला केला तर त्या स्वतःचे रक्षण करू शकतील का? सर्वच मुली हिंमतीने पुरुषाचा प्रतिकार करू शकतील असे नाही. फारच थोड्या मुली आहेत ज्या स्वसंरक्षणासाठी पुरुषांशी दोन हात करतील. आपल्या समाजाचे शिक्षण असे आहे की मुली आक्रमक नसतात, त्यांना शांत राहायला शिकवले जाते. हात उचलण्यासाठी जो आक्रमक पवित्रा घ्यावा लागतो त्याची कमतरता मुलींमध्ये आहे. मिरची स्प्रे मात्र सर्व वयोगटातील मुलींना आणि स्त्रियांना का मात पडणारी गोष्ट आहे. एकदा मिरची स्प्रेचा वापर केला तर आजूबाजूच्या अनेक व्यक्ती काही काळासाठी इतके दुबळे होतात की ते कोणावर हल्ला करू शकत नाही. मिरची स्प्रेचा इफेक्ट अर्धा तास तरी असतो. मिरची स्प्रेचा वापर करून मुलगी धोक्याच्या ठिकाणाहून पळून जाऊ शकतात. मिरची स्प्रे तिला सुरक्षित ठिकाणी जाण्याची संधी देतो. मिरची स्प्रे फार महाग नाही आणि तो घरी सुद्धा बनवता येतो. या अत्यंत महत्त्वाच्या मिरची स्प्रेबद्दल मुलींना माहिती नाही.

**प्रश्न क्र. 29 :- स्त्री म्हणून तुम्ही अनेक गोष्टी करू शकत नाही आणि सुरक्षित नाही हे तुम्हाला कोण सारख सांगत?**

| **वयवर्षे 18 ते 25** | | **वय वर्ष 25 च्यापुढे** | |
|---|---|---|---|
| कुटुंब | 34.8% | कुटुंब | 31.1% |
| समाज | 62.2% | समाज | 41.3% |
| शिक्षणपद्धती | 10.8% | शिक्षणपद्धती | 5.9% |
| शारीरिक अक्षमता | 8.9% | शारीरिक अक्षमता | 6.6% |
| स्वतःलाच असे वाटते | 13.8% | स्वतःलाच असे वाटते | 11.8% |
| कुणीही नाही | 16.8% | कुणीही नाही | 3.3.% |

**18 ते 25 वयोगट :** स्त्री म्हणून तुम्ही अनेक गोष्टी करू शकत नाही आणि सुरक्षित नाही हे तुम्हाला कोण सारखे सांगते या प्रश्नाचे उत्तर देताना 62.2 टक्के तरुणींनी समाज हे दिले आहे. त्यानंतर 34.8 टक्के मुली कुटुंबाने हे सांगितल्याचे म्हणतात. 13.8 टक्के मुलींना स्वतःलाच स्त्री म्हणून आपण अनेक गोष्टी करू शकत नाही असे वाटते. शिक्षण पद्धती 10.8 टक्क्यांनी तर शारीरिक अक्षमता 8.9 टक्क्याने दुर्बल असल्याचे जाणवून देतात असे तरुणींनी सांगितले. केवळ 16.8 टक्के मुलींना आपण सक्षम आहोत असे वाटते.

**25 वर्षांपुढे :** स्त्री म्हणून स्वतःच्या मर्यादांची जाणीव करून देणारा समाज 41.3 टक्के महिलांनी अनुभवला असून 31.1 टक्के महिलांना त्यांच्या कुटुंबाने स्त्री म्हणून तुम्ही अनेक गोष्टी करू शकत नाही आणि सुरक्षित नाही असे सांगितले. अनेक महिलांनाही ते पटते कारण अनुक्रमे 6.6 टक्के व 5.9 टक्के महिला त्याचा दोष शारीरिक क्षमता आणि शिक्षण पद्धतीला देतात.

**तुलनात्मक अध्ययन :** स्त्री म्हणून तुम्ही अनेक गोष्टी करू शकत नाही आणि सुरक्षित नाही हे तुम्हाला कोण सारखे सांगते, या प्रश्नांची आलेली उत्तरे ही खरोखर विचार करायला लावणारी आहेत. जुन्या पिढीत सुरक्षित नसल्याचे ज्या स्त्रोतातून महिलांना सांगितले जात असे ते प्रमाण नव्या पिढीत वाढलेच असल्याचे लक्षात येते. महिला म्हणून सुरक्षित नाही हे जुन्या पिढीत 41.3 टक्के समाजातून सांगण्यात येत असले तरी हे प्रमाण नव्या पिढीतसुद्धा वाढून 62.2 टक्के झाले आहे आहे. पूर्वी कुटूंबातून 31.1 टक्के सांगण्यात येत असे तर आज हे प्रमाण 34.8 टक्के वाढले आहे. स्वतःलाच महिला म्हणून असुरक्षित वाटत असल्याचे प्रमाण पूर्वी 11.8 टक्के तर आज 13.8 टक्के आहे. शिक्षण पद्धतीत पूर्वी 5.8 टक्के तर आज 10.8 टक्के सांगितल्या जात आहे. सर्वात कटू बाब म्हणजे पूर्वी 36.7 टक्के महिलांना तुम्ही सुरक्षित नाही, असे कुणीही सांगितले नाही हे प्रमाण 3.3 टक्के होते तर ते घटून आता 16.8 टक्के वर आले आहे. ही बाब विशेष लक्षात घेण्याजोगी आहे.

**निष्कर्ष :** 18 ते 25 या वयोगटातील 16.8 टक्के मुली असे सांगतात की स्त्री म्हणून त्या अनेक गोष्टी करू शकत नाही आणि सुरक्षित नाही, असं त्यांना कोणीही कधी सांगितलं नाही. याचाच अर्थ असा की, 83.2 टक्के मुलींना कोणीतरी सतत सांगत असतं की, त्या स्त्री म्हणून अनेक गोष्टी करू शकत नाही आणि सुरक्षित नाही. कुटुंब (34.8 टक्के), समाज (62.2 टक्के), शिक्षण पद्धती द्वारे 10.8 टक्के मुलींना सांगितले जाते की, त्या स्त्री म्हणून अक्षम आणि असुरक्षित आहेत. हे प्रमाण लक्षणीय आहे.

समाज म्हणून आपण बदलायला हवे असे ही आकडेवारी सांगते. 13.8 टक्के मुलींना स्वतःलाच असे वाटते की त्या दुबळ्या आणि असुरक्षित आहेत. असे का? याचा शोध घेणे देखील गरजेचे आहे. 8.9 टक्के मुलींना आपण शारीरिकदृष्ट्या अक्षम आहोत असे वाटते. त्यांच्या नकळत त्या स्वतःची तुलना पुरुषांशी करतात आणि असा समज करून घेतात की त्या दुबळ्या आहेत असे दिसते.